## प्रकरण पाचवे

# माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

# प्रकरण पाचवे

# माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

५.१ प्रस्तावना

५.२ प्रश्नावलीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन्

क) प्राचार्यांची वैयक्तिक माहिती

ख) कनिष्ठ महाविद्यालयांची सर्वसामान्य माहिती

ग) कनिष्ठ महाविद्यालयांतील व्यवस्थापनाविषयी माहिती

घ) प्राध्यापकांच्या नियोजन व प्रशासनासंबंधी माहिती

च) विद्यार्थी प्रशासनाविषयी माहिती

छ) कर्मचाऱ्यांच्या नियोजन व प्रशासनाविषयी माहिती

ज) कनिष्ठ महाविद्यालयांच्या भौतिक सुविधाविषयी माहिती

झ) आर्थिक बाबीविषयी माहिती

ट) परीक्षाविषयी नियोजन व प्रशासनाची माहिती

ठ) कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनामध्ये सुधारणाविषयी माहिती

५.३ मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

क) प्राध्यापकांच्या मुलाखतीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

ख) संस्थाचालकांच्या मुलाखतीच्या सहाय्याने मिळालेल्या महितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

ग) शासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखतींच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

५.४ भेटी व निरीक्षणाद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

५.५ समारोप

# प्रकरण पाचवे

## माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

५.१ प्रस्तावना :-

प्रकरण तीनमध्ये संशोधनासाठी माहिती मिळविण्यासाठी कोणती पध्दती व साधने वापरली हे दिले आहे.

"बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयांतील नियोजन व प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास" हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. प्रश्नावली, मुलाखती, भेटी व निरीक्षण यांचा उपयोग करुन मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन या प्रकरणात केले आहे.

५.२ प्रश्नावलीच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-


संशोधकाने संशोधनाची उद्दिष्टये लक्षात घेऊन प्रश्नावली तयार केली. प्रश्नावली परिशिष्ट दोन मध्ये दिली आहेत. एकूण पंधरा प्राचार्यांनी प्रश्नावली भरुन दिली.

क) प्राचार्यांची वैयक्तिक माहिती :-

या विभागातील प्रश्न क्र. १ हां प्राचार्यांचे नांव व कनिष्ठ महाविद्यालयाच्या नावाविषयी होता. प्रतिसादक कनिष्ठ महाविद्यालयाच्या नावांची यादी परिशिष्ठ क्र. एक मध्ये दिली आहे. तसेच प्रतिसादक प्राचार्यांच्या नावांची यादी परिशिष्ट क्र. तीन मध्ये दिली आहे.

प्रतिसादकाकडून माहिती मिळविताना प्रतिसादक जर जास्त शैक्षणिक व्यवसायिक पात्रता धारण करणारे असतील तर त्यांच्या कडून मिळणारी माहिती ही अधिक महत्वाची असते. म्हणून या विभागातील प्र.क्र.२ हा प्रतिसादकांच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधी विचारला होता त्या माहितीचे वर्गीकरण पुढे दिले आहे.

# आलेख क्रमांक ५.०१
## प्रतिसादक प्राचार्यांच्या शैक्षणिक अर्हतेचे वर्गीकरण
कोष्टक क्र. ५.१



कोष्टक क्रमांक ५.१

प्रतिसादक प्राचार्यांच्या शैक्षणिक अर्हतेचे वर्गीकरण

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | प्रतिसादक संख्या प्राचार्य | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एम.कॉम.पीएच.डी. | १ | ६.६६ |
| २ | एम.ए.बी.एड. | ३ | २०.०० |
| ३ | एम.ए. | १ | ६.६६ |
| ४ | बी.एस्सी.एम.ए.एम.एड. | १ | ६.६६ |
| ५ | बी.एस्सी.(ॲग्री) बी.एड. | १ | ६.६६ |
| ६ | बी.एस्सी.बी.एड. | २ | १३.३३ |
| ७ | बी.ए.बी.एड. | ४ | २६.६६ |
| ८ | बी.कॉम.बी.एड. | १ | ६.६६ |
| ९ | बी.ए.बी.पी.एड. | १ | ६.६६ |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसूनं येते की प्रतिसादक प्राचार्य बी.ए.बी.एड. ४(२६.६६ टक्के) होते, एम.ए.बी.एड. ३(२० टक्के) होते, बी.एस्सी.बी.एड. २(१३.३३ टक्के) होते, एम.कॉम.पीएच.डी., एम.ए.बी.एड, एम.ए.एम.एड, बी. एस्सी.(ॲग्री) बी.एड., बी.कॉम. बी.एड., बी.ए.बी.पी.एड. प्रत्येकी एक (६.६६ टक्के) होते.

यावरुन जास्तीत जास्त प्राचार्य ४ (२६.६६ टक्के) हे बी.ए.बी.एड. होते. कनिष्ठ महाविद्यालयातील जास्तीत जास्त प्राचार्य पदव्युत्तर प्रशिक्षित असयला पाहिजे प्रस्तुत संशोधनातील एकूण १५ पैकी १२ कनिष्ठ महाविद्यालयाचे माध्यमिक शाळेशी संलग्न असल्याने शैक्षणिक अर्हता माध्यमिकशी पूरक अशी आहे. परंतू कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य हे एम.ए.एम.कॉम किंवा एम.एस्सी.बी.एड. असावेत.पाच ( ३३.३३ टक्के) प्राचार्य आवश्यक तो शैक्षणिक पात्रता धारण

करणारे होते बाकीचे दहा (६६.६६ टक्के) प्राचार्य आवश्यक ती शैक्षणिक पात्रत धारण न करणारे होते.

यावरुन बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयांतील बहुसंख्य प्राचार्य हे आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारण न करणारे होते. त्यांचा परिणाम प्रशासनावर होतो कारण त्यांच्या अधिकाराखाली काम करणारे प्राध्यापक त्यांच्यापेक्षा जास्त शैक्षणिक पात्रता धारण करणारे असतात व असे प्राचार्य त्यांच्यावर पुरेसा वचक ठेवू शकत नाहीत असे संशोधकाला वाटते. योग्य प्रशासनाच्या दृष्टीने हे निश्चितच योग्य नाही. सर्व प्राचार्य एम.ए.एड. किंवा एम. एस्सी., एम.कॉम.बी.एड. तरी असावेत म्हणजे ते शैक्षणिक पात्रतेनुसार आपल्या सहकारी प्राध्यापकांच्या व्यवसायिक गुणवत्तेवर देखरेख करु शकतात त्यांना मार्गदर्शन करु शकतात.

या विभागातील प्रश्न क्रं ३ हा प्रतिसादक प्राचार्यांच्या अनुभवाविषयी होता. प्रश्नावलीद्वारे प्राप्त माहिती खालील कोष्टकात दिलेली आहे.

कोष्टक क्र. ५.२

प्रतिसादक प्राचार्यांच्या अनुभवाचे वर्गीकरण

| अ.क्र. | अनुभव वर्षे (वारंवारता) | प्राचार्य म्हणून अनुभव वर्षे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १ ते ५ | ८ | ५३.३३ |
| २ | ६ ते १० | ४ | २६.६६ |
| ३ | ११ ते १५ | १ | ६.६६ |
| ४ | १६ ते २० | ० | ०.०० |
| ५ | २१ ते २५ | १ | ६.६६ |
| ६ | २६ ते ३० | १ | ६.६६ |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकावरुन दिसून येते की, १ ते ५ वर्षे अनुभव असणारे प्राचार्य ८ (५३.३३ टक्के) होते, ६ ते १० वर्षे अनुभव असणारे प्राचार्य ४ (२६.६६ टक्के) होते, ११ ते १५ वर्षे अनुभव असणारे प्राचार्य १ (६.६६ टक्के) होते, २१ ते २५ वर्षे अनुभव असणारे प्राचार्य १ (६.६६ टक्के) होते, २६ ते ३० वर्षे अनुभव असणारे प्राचार्य १(६.६६ टक्के). हे प्राध्यापक म्हणून अनुभव असलेले प्राचार्य एकही नव्हते. त्यांना माध्यमिक वा वरिष्ठ महाविद्यालयाचा अध्यापन अनुभव होता.

वरील माहितीवरुन बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांचा १ ते ५ वर्षे अनुभव असणाऱ्यांची संख्या ८ (५३.३३ टक्के) ही अधिक होती. त्या तुलनेत २१ ते ३० वर्षे प्राचार्य पदाचा अनुभव असणाऱ्यांची संख्या एक ,एक (६.६६ टक्के) अशी कमी होती. तर ४ प्राचार्यांचा अनुभव ६ ते १० वर्षे होता. याचा अर्थ प्राचार्य म्हणून बहुसंख्य प्राचार्यांचा अनुभव बरा होता. पण प्राध्यापक म्हणून काम करण्याचा अनुभव नव्हता. ज्या प्राचार्यांना कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून शिकविण्याचा अनुभव नाही ते प्राचार्य आपल्या प्राध्यापकांवर अभ्यासक्रम, अभ्यापन या बाबतीत व्यवस्थित देखरेख करु शकतील याविषयी संशोधकाला शंका वाटते. कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवत्तेच्या दृष्टीने शैक्षणिक पात्रता कमी असणारे प्राचार्य अधिक होते. ही यशस्वी प्रशासनाच्या दृष्टने योग्य बाब नाही.

ख) <u>कनिष्ठ महाविद्यालयांची सर्वसामान्य माहिती</u> :-

या विभागात कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वसामान्य माहितीवर प्रश्न होते यात ४ ते १९ असे एकूण १६ प्रश्न विचारले होते.

या विभागातील प्र.क्र. ४ हा कनिष्ठ महाविद्यालय हे वरिष्ठ महाविद्यालयास की माध्यमिक विद्यालयास जोडलेले आहे असा होता. प्रतिसादकाकडून मिळालेली माहिती पुढील प्रमाणे आहे.

एकूण १५ ते कनिष्ठ महाविद्यालयांपैकी १२ (८० टक्के) कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळांशी संलग्न होती तर ३ (२० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयचे वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न होती.

यावरुन असे दिसून येते की, बार्शी तालुक्यातील जास्तीत जास्त कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळांना जोडलेली होती.

प्र.क्र. ५ हा कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेले असल्यास त्याचे फायदे कोणते असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिले आहे.

कोष्टक क्र. ५.३

कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेले असल्यास फायदे दाखविणारे वर्गीकरण

| अ. क्र. | फायदे | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेक्डा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथालय समृध्द असते | १५ | १००.०० |
| २ | प्रयोगशाळा सुसज्ज असते | ८ | ५३.३३ |
| ३ | वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळते | ६ | ४०.०० |
| ४ | इमारत मोठी असते | ४ | २६.६६ |
| ५ | इतर | ० | ००.०० |
| | एकूण | ३३ | |

(टीप काही प्रतिसादकांनी एकापेक्षा अधिक पर्याय सांगितले असल्याणे एकूण प्रतिसादक संख्या जास्त येते.)

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालय समृध्द असते म्हणणाऱ्यांची संख्या १५ (१०० टक्के) होती, प्रयोगशाळा सुसज्ज असते असे म्हणणाऱ्यांची संख्या ८ (५३.३३ टक्के) होती, वरिष्ठ महाविद्यालयांच्या प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळते असे म्हणणाऱ्यांची संख्या ६ (४० टक्के) होती, इमारत मोठी असते म्हणणाऱ्यांची संख्या ५ (२६.६६ टक्के) होती, इतर मत कोणीही व्यक्त केले नाही.

यावरुन आकडेवारीचे निरीक्षण करता ग्रंथालय समृध्द असते असा प्रतिसाद सर्वाधिक १५ (१०० टक्के) होता. थोडक्यात पुस्तकांची विपुलता अत्यंत महत्वाची असल्याने प्राचार्यांचे एकमत आढळून आले. प्रयोगशाळा सुसज्ज असते असे ८ (५३.३३ टक्के) प्राचार्यांनी स्पष्ट केले. यावरुन वरिष्ठ महाविद्यालयात असणाऱ्या सुसज्ज ग्रंथालय व प्रयोगशाळांचा उपयोग कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना होतो. हा फायदा महत्वाचा आहे असे संशोधकाला वाटते. इमारतीच्या आकाराच्या बाबतीत प्रतिसाद कमी ४ (२६.६६ टक्के) होता.

कनिष्ठ महाविद्यालये वरिष्ठ महाविद्यालयांना जोडण्यात कोणताही तोटा नसल्याचे प्राचार्यांच्या प्रतिसादावरुन लक्षात आले.

प्रश्न.क्र. ६ कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळांना जोडलेले असल्यास फायदे तोटे कोणते? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिले आहे.

## कोष्टक क्र. ५.४

## कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळेला जोडल्यास फायदे-तोटे दर्शविणाऱ्या प्रतिसादाचे वर्गीकरण

| अ.क्र. | फायदे | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देता येते | ६ | ४०.०० |
| २ | विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राहते | ५ | ३३.३३ |
| ३ | विद्यार्थ्यांना व्यक्तिगत मार्गदर्शन करणे सुलभ होते. | २ | १३.३३ |
| ४ | विद्यार्थ्यांच्या कुवतीप्रमाणे मार्गदर्शन करता येते. | ३ | २०.०० |
| ५ | ग्रामीण भागात विद्यार्थ्यांची सोय होते. | १ | ६.६६ |
| ६ | आर्थिक दृष्टया पालकांना सोयीचे ठरते. | १ | ६.६६ |
| ७ | विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण चांगले राहते | २ | १३.३३ |
| ८ | उच्च माध्यमिकचे शिक्षक माध्यमिकसाठी उपयोगी पडतात. | १ | ६.६६ |
| | एकूण | २१ | |
| | तोटे :- | | |
| १ | तासिका लहान असल्याने अभ्यासक्रम पूर्ण करणे अवघड होते. | ८ | ५३.३३ |
| २ | तासिका लहान असल्याने प्राध्यापक पूर्ण वेळ घेण्यात व्यत्यय येतो. | ९ | ६०.०० |
| ३ | ग्रंथालय समृध्द नसते. | २ | १३.३३ |
| ४ | इतर | ६ | ४०.०० |
| | एकूण | २५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, फायदे व तोटे दर्शविताना फायदयाबाबतचे अभिप्रायावरुन वैयक्तिक लक्ष देता येते असे ६ (४० टक्के) प्राचार्यांनी सांगितले, शिस्त राहते असे ५ (३३.३३ टक्के) प्राचार्यांनी सांगितले, विद्यार्थ्यांच्या कुवतीप्रमाण मार्गदर्शन करता येते. असे ३ (२० टक्के) प्राचर्यांनी सांगितले.प्रत्येकी २ (१३.३३ टक्के) प्राचार्यांनी व्यक्तिगत मार्गदर्शन करता येते, विद्यार्थ्यांचे उपस्थितीचे प्रमाण चांगले राहते असे सांगितले.प्रत्येकी १ (६.६६ टक्के) प्राचार्यांनी ग्रामीण भागात विद्यार्थ्यांची सोय होत, आर्थिक दृष्टया पालकांना सोयीचे ठरते व उच्च माध्यमिकचे प्राध्यापक माध्यमिकला उपयोगी पडतात असे सांगितले.

तसेच माध्यमिक शाळेशी संलग्नतेबाबत तोटेविषयक प्रतिसादकामध्ये ८(५३.३३ टक्के) प्राचार्यांनी तासिका लहान असल्याने अभ्यासक्रम पूर्ण होण्याबाबत समस्या येतात असे सांगितले. नऊ (६० टक्के) प्राचार्यांनी तासिका लहान असल्याने प्राध्यापक पूर्ण वेळ घेण्यास समस्या येतात असे सांगितले. दोन (१३.३३ टक्के) प्रतिसादक प्राचर्यांनी ग्रंथालय समृध्द नसते असे सांगितले व सहा(४० टक्के) प्राचार्यांनी उत्तर दिले नाही. त्यामुळे त्यांनीही एक प्रकारे अप्रत्यक्षपणे वरील मतांना दुजोरा दिला आहे.


यावरुन कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळांना जोडण्यात खालील फायदे असल्याचे दर्शविले. विद्यार्थ्यांच्या कुवतीप्रमाणे व्यक्तिगत मार्गदर्शन करता येते, उपस्थितीचे प्रमाण चांगले राखता येते. तसेच उच्च माध्यमिकचे प्राध्यापक माध्यमिकचे विषय शिकविण्यास उपयोगी पडतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय होते व पालकांना आर्थिक दृष्टया ते परवडणारे असते. असे फायदे दिसून येतात.

कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळांना जोडल्यास खालील तोटे दर्शविण्यात आले.

## आलेख क्रमांक ५.०२

## कनिष्ठ महाविद्यालयातील शाखाबाबत माहितीचे वर्गीकरण

कोष्टक क्र. ५.५



१. तासिका कमी कालावधीच्या असल्याने उच्च माध्यमिकच्या अभ्यासक्रमास त्या कमी पडतात.

२. प्राध्यापकांची पूर्ण वेळ नेमणूक करण्यात अडचणी येतात.

३. ग्रंथालय प्रयोगशाळा सुसज्ज नसतात.

या फायदे तोटयांच्या संदर्भात कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळांना जोडणे चांगले की वरिष्ठ महाविद्यालयांना या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी मुलाखतीमध्ये प्राध्यापकांचे या बाबतीत मत घेतले असता बहुतेक प्राध्यापकांनी कनिष्ठ महाविद्यालये स्वतंत्र व्यवस्थापनासाठी असावी असे सांगितले.

प्रश्न.क्र. ७ हा महाविद्यालयातील शाखा कोणत्या आहेत असा होता. प्रतिसादकांकडून आलेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिले आहे.

कोष्टक क्र. ५.५

कनिष्ठ महाविद्यालयातील शाखाबाबत माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादकाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | केवळ कला | १० | ६६.६६ |
| २ | कला व वाणिज्य | १ | ६.६६ |
| ३ | कला व शास्त्र | ४ | २६.६६ |
| ४ | कला, वाणिज्य व शास्त्र | ०० | ००.०० |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, केवळ कला शाखा असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या १०(६६.६६ टक्के) होती. कला व वाणिज्य शाखा असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या ४(२६.६६ टक्के) होती. कला, वाणिज्य व शास्त्र एकत्र असलेले एकही कनिष्ठ महाविद्यालय बार्शी तालुक्यात नाही.

यावरुन बहुतांशी कनिष्ठ महाविद्यालयात केवळ कला शाखा असल्याचे दिसून आले. वाणिज्य शाखेकडे विद्यार्थ्यांचा कल कमी होता. शास्त्र शाखा असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाची संख्या ४(२६.६६ टक्के) त्यामानाने कमीच होती. विद्यार्थ्यांचा कला शाखेकडे अधिक कल असल्याचे दिसून आले. शास्त्र शाखांची संख्या वाढावी असे संशोधकाला वाटते.


प्रश्न.क्र. ८ हा कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी व १२वी मिळून विद्यार्थी संख्या किती आहे असा होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

७६

आलेख क्रमांक ५.०३

शाखानिहाय विद्यार्थीसंख्याचे वर्गीकरण

कोष्टक क्र.५.६




कोष्टक क्र. ५.६


विद्यार्थी संख्याचे (इयत्ता ११वी व १२वी मिळून) वर्गीकरण :७

| अ.क्र | कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव | कला | वाणिज्य | विज्ञान | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिवाजी महाविद्यालय बार्शी | २००० | ... | १००० | ३००० |
| २ | महाराष्ट्र(उ.मा.)विद्यालय बार्शी | २५७ | ... | २७० | ५२७ |
| ३ | बी.पी.सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी | २५० | १७० | ... | ४२० |
| ४ | अभिनव कनिष्ठ महाविद्यालय बार्शी | ८७ | ... | ... | ८७ |
| ५ | अँग्लो ऊर्दू ज्युनिअर कॉलेज बार्शी | ७९ | ... | ... | ७९ |
| ६ | श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय बार्शी | १००० | ... | २५० | १२५० |
| ७ | सर्वोदय विद्यामंदीर व कनिष्ठ महाविद्यालय पांगरी | १२० | ... | ... | १२० |
| ८ | विद्यामंदीर कनिष्ठ महाविद्यालय वैराग | १३२ | ... | १६२ | २९४ |
| ९ | कन्या प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय वैराग | १६५ | ... | ... | १६५ |
| १० | विद्यासाधना ज्यु. कॉलेज वैराग | ११० | ... | ... | ११० |
| ११ | कर्मवीर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चारे | १०९ | ... | ... | १०९ |
| १२ | शेळगांव हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय शेळगांव | १०० | ... | ... | १०० |
| १३ | ॲड.दिलीपराव सोपल कनिष्ठ महाविद्यालय सुर्डी | १०५ | ... | ... | १०५ |
| १४ | एम.पी.ए.एन.माध्यमिक व उच्च माध्यमिक स्कूल गौडगांव | १०० | ... | ... | १०० |
| १५ | मित्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मळेगांव | ११५ | ... | ... | ११५ |
| | एकूण | ४७२९ | १७० | १६८२ | ६५८१ |
| | विद्यार्थी संख्या शेकडा प्रमाण | ७१.८५ | २.५८ | २५.५५ | १०० |

# आलेख क्रमांक ५.०४
## अकरांवी वर्गातील विद्यार्थी संख्येचे वर्गीकरण
कोष्टक क्र. ५.७




# आलेख क्रमांक ५.५
## बारावी वर्गातील विद्यार्थी संख्येचे वर्गीकरण
कोष्टक क्र. ५.७



वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालय शिक्षण घेणाऱ्या कला शाखेतील मुलांचे प्रमाण ७१.८५ टक्के होते. विज्ञान शाखेतील मुलांचे प्रमाण २५.५५ टक्के होते व वाणिज्य शाखेतील मुलांचे प्रमाण केवळ २.५८ टक्के होते.

यावरुन असे दिसून येते की, कला शाखेकडे विद्यार्थ्यांचा अधिक ओढा आहे. विज्ञान शाखेकडेही कलाशाखेपेक्षा विद्यार्थी कमी होते परंतु वाणिज्य शाखेकडे विद्यार्थ्यांचा कल अत्यंत निराशाजनक असल्याचे दिसून आले.

प्रश्न क्र. ९ हा प्रत्येक वर्गात विद्यार्थी संख्या किती आहे असा होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त माहितीचें वर्गीकरण पुढील कोष्टकात दिली आहे.

कोष्टक क्र. ५.७

प्रत्येक वर्गातील विद्यार्थी संख्येचे वर्गीकरण :-

| अ.क्र. | विद्यार्थी संख्येचे वारंवारिता | इयत्ता ११ वी | | इयत्ता १२ वी | |
|---|---|---|---|---|---|
| | | क.महा.संख्या | शेकडा प्रमाण | क.महा.संख्या | शेकडा प्रमाण |
| १ | २१ ते ४० | .. | .. | २ | १३.३३ |
| २ | ४१ ते ६० | ६ | ४०.०० | ७ | ४६.६६ |
| ३ | ६१ ते ८० | ६ | ४०.०० | ४ | २६.६६ |
| ४ | ८१ ते १०० | २ | १३.३३ | १ | ६.६६ |
| ५ | १०१ ते १२५ | १ | ६.६६ | १ | ६.६६ |
| | एकूण | १५ | | १५ | |

वरील कोष्टकावरुन दिसून येते की, इयत्ता ११ वीच्या वर्गात २१ ते ४० विद्यार्थी संख्या असलेले एकही कनिष्ठ महाविद्यालय नव्हते. इयत्ता १२वीच्या वर्गात २१ ते ४० विद्यार्थी संख्या असलेले २ (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये होती.इयत्ता ११वीच्या वर्गात ४१ ते ६० विद्यार्थी संख्या असलेली सहा(४० टक्के) कनिष्ठ महाविद्यालये होती.याच गटात इयत्ता १२वी ची ७ (४६.६६ टक्के) कनिष्ठ

महाविद्यालय होती इयत्ता ११वीच्या वर्गात ६१ ते ८० विद्यार्थी संख्या असणारी ६ (४० टक्के) कनिष्ठ महाविद्यालये होती. याच गटात १२वीची ४(२६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालय होती. इयत्ता ११वीच्या वर्गात ८१ ते १०० विद्यार्थी संख्या असणारी २(१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये होती. इयत्ता ११वीच्या वर्गात १०१ ते १२५ विद्यार्थी संख्या असणारे १(६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालय होते. याच गटात इयत्ता १२वीचे १(६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालय होते.

यावरुन असे दिसून येते की, सर्वसाधारण ४१ ते ६० व ६१ ते ८० या गटात प्रत्येक गटात विद्यार्थी संख्या असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या १२ (८० टक्के) होती. २१ ते ४० व १०१ ते १२५ अशी किमान व कमाल प्रत्येक वर्गात विद्यार्थी संख्या असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या कमी होती. संशोधकाला असे वाटते की, विद्यार्थी संख्या योग्य प्रमाणात असल्याने अध्यापनास मदत होते. त्या दृष्टीने बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयांतील प्रत्येक वर्गातील विद्यार्थी संख्या समाधानकारक होती.

प्रश्न क्र. १० हा विद्यार्थी संख्या अधिक असल्यास कोणत्या समस्या निर्माण होतात असा होता. प्रतिसादक प्राचार्याकडून प्राप्त माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्रमांक ५.८

विद्यार्थी संख्या अधिक असल्याने समस्यांचे वर्गीकरण

| अ.क्र. | समस्यांचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वर्गातील शिस्त बिघडते. | १४ | ९३.३३ |
| २ | अध्यापन परिणामकारक होत नाही. | ८ | ५३.३३ |
| ३ | बैठक व्यवस्थेची समस्या निर्माण होते. | १२ | ८०.०० |
| ४ | मूल्यमापनात अचूकता येत नाही | ९ | ६०.०० |
| ५ | विद्यार्थी व शिक्षक अंतरक्रियेत मर्यादा येतात. | १२ | ८०.०० |
| | एकूण | ५५ | |

(टीप - काही प्रतिसादक प्राचार्यांनी एकापेक्षा अधिक प्रर्याय दिल्याने प्रतिसादक प्राचार्यांची संख्या जास्त येते.)

वरील कोष्टकावरुन दिसून येते की, शिस्त बिघडते असा प्रतिसाद देणऱ्या प्राचार्यांची संख्या १४(९३.३३ टक्के) होती. अध्यापन परिणामकारक होत नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या ८(५३.३३ टक्के) होती. बैठक व्यवस्थेची समस्या निर्माण होते असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या १२(८० टक्के) होती. मूल्यमापनात अचूकता येत नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांची संख्या ९(६० टक्के) होती. विद्यार्थी व शिक्षकात अंतरक्रियेत मर्यादा येतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्राचार्यांची संख्या १२(८० टक्के) होती.

यावरुन असे दिसून येते की, वर्गातील शिस्त बिघडते म्हणणाऱ्या प्राचार्यांची संख्या सर्वाधिक १४(९३.३३ टक्के) होती. बैठक व्यवस्था व अंतरक्रिया या बाबीदेखील महत्वाच्या आहेत. या संदर्भातही समस्या निर्माण होतात असे बहुसंख्य प्राचार्यांना वाटते. एकंदरीत विद्यार्थीसंख्या अधिक असल्याने समस्या जास्त निर्माण होतात.

संशोधकाने प्राध्यापकांच्या मुलाखतीमध्ये विद्यार्थी संख्येच्या संदर्भात प्रश्न विचारला असता बहुतेक प्राध्यापकांनी विद्यार्थी संख्या मर्यादित असावी असे मत व्यक्त केले. संशोधकालाही वाटते की, विद्यार्थी संख्या अधिक असणे शैक्षणिकदृष्टया फायदयाचे हाते नाही.

संशोधकाने बार्शी तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन निरीक्षण केले असता २(१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये वगळता इतर १३(८६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी संख्या मर्यादित होती ही समाधानकारक बाब वाटते.

प्रश्न क्र. ११ हा कनिष्ठ महाविद्यालय अनुदानीत आहे काय असा होता. प्रतिसादक प्राचार्यांनी दिलेल्या उत्तरावरुन १४(९३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालय अनुदानित होती. तर १(६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालय विनाअनुदानित होते.

यावरुन असे स्पष्ट होते की, बार्शी तालुक्यातील जास्तीत जास्त १४(९३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालय अनुदानित होती ही शैक्षणिक दृष्टया जमेची बाजू आहे. एक(६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालय विनाअनुदानित होते. संशोधकाला असे वाटते की, हे महाविद्यालय देखील अनुदानप्राप्त व्हावे. अनुदान मिळाल्यानंतर आवश्यक त्या शैक्षणिक सुविधा मिळाल्याने शैक्षणिक विकास होऊ शकतो.

प्रश्न क्र. १२ हा विनाअनुदानिंत असल्यास पुरेसा प्राध्यापक वर्ग आहे का असा होता एका(६.६६टक्के) प्रतिसादकाने नाही असे उत्तर दिले व १४(९३.३३टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की, बार्शी तालुक्यातील एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयापैकी १४ कनिष्ठ महाविद्यालये अनुदानित होती. त्यामुळे तेथे प्राध्यापक संख्या पुरेशी होती एका विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक संख्या पुरेशी नव्हती.

संशोधकाने प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाला प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण केले असता अनुदानित सर्व १४(९३.३३टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात पुरेसा प्राध्यापक

वर्ग असल्याचे दिसून आले. एका कनिष्ठ महाविद्यालयात अनुदानाअभावी पुरेशे प्राध्यापक नियुक्त करणे न परवडनारे असल्याने कमतरता दिसून आली. परंतू शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने ही बाब समाधान करक वाटत नाही.

प्रश्न क्र. १३ हा विना अनुदानित असल्यामुळे प्रध्यापकांना पुरेसा पगार दिला जातो काय असा होता. बार्शी तालुक्यात फक्त एकच कनिष्ठ महाविद्यालय विना अनुदानित असल्याने तेथील प्राचार्यांनी प्राध्यापकांना पुरेसा पगार देता येत नाही असे सांगीतले. बाकीच्या सर्व म्हणजे १४(९३.३३टक्के) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये तो प्रश्न येत नाही.

प्राध्यापकांना पुरेसा पगार मिळाल्यानंतरच ते कामात लक्ष देतील अन्यथा त्यांची मानसिक तयारी असणार नाही. त्यामुळे संशोधकाला वाटते की प्राध्यापकांना पुरसा पगार मिळणे आवश्यक आहे. बार्शी तालुक्यातील १४(९३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये अनुदानित होती ही जमेची बाजू आहे.

प्रश्न क्र. १४ हा प्रध्यापकांना पुरेसा पगार दिला जात नसल्यास अध्यापनाच्या बाबतीत कोणत्या समस्या निर्माण होतात असा होता. प्रतिसादक प्राचार्याकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.९

अपुऱ्या पगारामुळे अध्यापनात येणाऱ्या समस्याविषयक माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक सं. | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अध्यापनात प्राध्यापकांची नीरसता आढळून येते. | ७ | ४६.६६ |
| २ | वरिष्ठांविषयी अनादराची भावना आढळून येते | ६ | ४०.०० |
| ३ | आंतर क्रिया सुसंवादी होत नाही | ४ | ..... |
| ४ | अनुत्तरित | ८ | ५३.३३ |
| | एकूण | २५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ७(४६.६६टक्के) प्रतिसादक प्राचार्यांनी अध्यापनात प्राध्यापकांची नीरसता आढळून येते. असा प्रतिसाद दिला. ६(४०.००) प्रतिसादक प्राचार्यांनी वरिष्ठाविषयी अनादराची भावना आढळून येते असे सांगितले चार (२६.६६) प्रतिसादक प्राचार्यांनी आंतर क्रिया सुरुवादी होत नाही इसे मत दिले. आठ(५३.३३) प्राचार्यांनी कोणत्याही स्वरुपाचा प्रतिसाद दिला नाही .

यावरुन असे दिसुन येते की अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील ८(५३.३३ टक्के) प्राचार्यांनी आपला या प्रश्नाशी संबंध नसल्याचे स्पष्ट केले .परंतु बाकी ७(४६.६६ टक्के)प्राचार्यांनी आपापल्या अनुभवानुसार वरीलप्रमाणे प्रतिसाद दिला.

प्राध्यापकांना पुरेसा पगार नसल्यास स्वभाविकपणे प्राध्यापक उत्साहाने अध्यापन करणार नाही. प्राचार्याविषयी,संस्थेविषयी आदराची भावना राहत नाही,संशोधकाने कनिष्ठ महाविद्यालयांना दिलेल्सा भेटी व निरिक्षणातून असे आढळले की प्राध्यापकांना आर्थिक अडचण भासल्यास तो विविध मार्ग शोधू

लागतो. परिणामी अध्यापनाकडे दुर्लक्ष होऊ शकते तरी प्राध्यापकांना नियमानुसार पुरेसा पगार मिळणे शैक्षणिक दृष्या आवश्यक असते असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. १५ हा विषयानुसार पुरेसे प्राध्यापक नसल्यास अध्यापनात कोणत्या समस्या येतात असा होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.१०

विषयानुसार पुरेसे प्राध्यापकांच्या अभावामुळे येणाऱ्या अडचणीविषयी माहितीचे वर्गीकरण

| अ. क्र. | अडचणीचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आवड नसताना एखाद्या विषयाचे अध्यापन करावयास लावावे लागते | ९ | ६०.०० |
| २ | सखोल अध्यापन होत नाही | ८ | ५३.३३ |
| ३ | विद्यार्थी प्राध्यापकाविषयी तक्रार करतात | ७ | ४६.६६ |
| ४ | अनुत्तरित | ६ | ४०.०० |
| | एकूण | ३० | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, आवड नसताना एखाद्या विषयाचे अध्यापन करावयास लावावे लागते असा प्रतिसाद ९(६०.०० टक्के) प्राचार्यांनी दिला सखोल अध्यापन होत नाही ८(५३.३३ टक्के) प्राचार्यांनी सांगितले, विद्यार्थी प्राध्यापकाविषयी तक्रार करतात असा ७(४६.६६ टक्के) प्राचार्यांनी दिला. ६(४०.०० टक्के) प्राचार्यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही.

यावरुन असे दिसून येते की, उपलब्ध प्राध्यापकांना गरजेनूसार विविध विषयांचे अध्यापन करावे लागते व त्यामुळे स्वाभाविकच प्रत्येक विषयाचे सखोल

अध्यापन होणे शक्य होत नाही. म्हणूनच विद्यार्थी देखील प्राध्यापकाविषयी तक्रार करतात.

प्रश्न क्र. १६ हा प्रत्येक विषयासाठी त्याविषयातील तज्ञ प्राध्यापक उपलब्ध आहेत काय असा होता. एकूण १५ प्रतिसादक प्राचार्यापैकी १४(९३.३३ टक्के) प्राचार्यांनी होय असे उत्तर दिले. एक(६.६६ टक्के) प्राचार्यांनी नाही असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की कनिष्ठ महाविद्यालयात आवश्यक शैक्षणिक पात्रतेतुसार, विषयानुसार प्राध्यापकांची नियुक्ती करणे शक्य असते. परंतू विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालय तज्ञ प्राध्यापकांचा अभाव असतो. प्राध्यापकांच्या मुलाखतीतून असे आढळुन आले की बहुतांशी ठिकाणी एकच प्राध्यापक दोन विषय शिकवितात. बहुतांशी कनिष्ठ महाविद्यालयात तज्ञ व अनुभवी प्राध्यापक होते.

संशोधकाने भेटी व निरीक्षणावेळी पाहिले असता प्राध्यापकांचे नियुक्ती पूर्ण वेळ होण्याकरिता दोन विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आढळून आले. विशेषता ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयात अशी स्थिती होती. संशोधकाचे मत असे आहे की, विषयानुसार तज्ञ व पुरेसे प्राध्यापक असणे आवश्यक असते.

प्रश्न क्र. १७ हा कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिकला जोडलेले असल्यास प्राध्यापकांना माध्यमिक शाळेचे काही तास घ्यावे लागतात काय असा होता एकुण १५ प्रतिसादक प्राचार्यापैकी १२(८०.०० टक्के) प्राचार्यांनी होय असे उत्तर दिले होते. एका(६.६६ टक्के) प्राचार्यांनी नाही असे उत्तर दिले. दोन(१३.३३ टक्के ) प्राचार्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन बहुसंख्य माध्यमिक शाळांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना माध्यमिक शाळेचे काही तास दिलेले असतात. या संदर्भात प्रत्यक्ष निरीक्षण केले असता माध्यमिकशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील काही प्राध्यापकांना माध्यमिकचे तास दिल्याचे आढळून आले.

प्रश्न क्र. १८ हा माध्यमिक शाळेचे किती तास घ्यावे लागतात असा होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.११

माध्यमिकशी संलग्न असल्यास अध्यापन तासिकाविषयी माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | तासिकांविषयी वारंवारिता | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १ ते ५ | २ | १३.३३ |
| २ | ६ ते १० | १ | ६.६६ |
| ३ | ११ ते १५ | २ | १३.३३ |
| ४ | १६ ते २० | ४ | २६.६६ |
| ५ | २१ ते २५ | २ | १३.३३ |
| ६ | अनुत्तरित | ४ | २६.६६ |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकापरुन असे दिसुन येते की,२(१३.३३ टक्के) प्राचार्यांनी १ते५ तासिका घ्याव्या लागतात असे उत्तर दिले. एक(६.६६टक्के) प्राचार्यांनी ६ ते१० तासिका घ्याव्या लागतात असे उत्तर दिले. दोन(१३.३३ टक्के)प्राचार्यांनी ११ ते १५ तासिका घ्याव्या लागतात असे उत्तर दिले. चार(२६.६६ टक्के)प्राचार्यांनी १६ ते २० तासिका घ्याव्या लागतात असे उत्तर दिले. दोन (१३.३३ टक्के) प्राचार्यांनी २१ ते २५ तासिका घ्याव्या लागतात असे उत्तर दिले. चार (२६.६६ टक्के) प्राचार्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

बार्शी तालुक्यातील जास्तीत जास्त १२(८०.००टक्के) कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळेशी सलंग्न आसल्याचे त्यांना मांध्यमिक शाळेच्या तासिका दिल्याजातात प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्या आसता अशी माहीती मिळाली

माध्यमिकशी संलग्न काही प्राध्यापकांना माध्यमिकच्या आवश्यक तेवढया तासिका देऊन पूर्णवेळ नियुक्ती दिली जाते .

यावरुन असे लक्षात येते की माध्यमिक शाळांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना आठवडयातून १ पसून २५ पर्यंत तासिका घ्याव्या लागतात. याचा अर्थ काही प्राध्यापक माध्यमिक शाळेचा आठवडयाचा जास्तीत जास्त कार्यभार घेतात व कनिष्ठ माहाविद्यालयाचा कमी कार्यभार त्याच्याकडे असतो. अनेक प्राध्यापकांना मांध्यमिक शाळेचा आर्धा (५० टक्के) कार्यभार स्वीकारावा लागतो असे दिसून येते.

माध्यमिक शाळेला व कनिष्ठ महाविद्यालयाचा असे दोन्ही स्तरावरील कार्यभार सांभाळण्याऱ्या प्राध्यापकांना दोन्ही कामाची कसरत करावी लागते. त्यामुळे ते दोन्ही कामाला न्याय देऊ शकत नाहीत असे संशोधकाला वाटते. यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे स्वतंत्र व्यवस्थापन, स्वतंत्र प्राचार्य असणे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. १९ हा माध्यमिक शाळेतील तासिका कमी कालावधीची असते त्याच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापनावर कोणता परिणाम होतो असा होता. प्रतिसादक प्राचार्या कडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.१२

तासिका कमी कालावधीची असल्यामुळे अध्यापनावरील परीणामाचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादकाचे स्वरुप | प्रतिसादक सं. | प्रतिसादक शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अभ्यासक्रम पूर्ण करणे अवघड | ११ | ७३.३३ |
| २ | विद्यार्थ्यांची एकाग्रता भंग पावते | ४ | २६.६६ |
| ३ | इतर | | |
| | १.सुसंगत अध्यापनात व्यतय येतो. | १ | ६.६६ |
| | २.जादा तास घ्यावे लागतात. | १ | ६.६६ |
| ४ | अनुत्तरित | २ | १३.३३ |
| | एकूण | १९ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ११(७३.३३ टक्के) प्रतसादकांनी अभ्यासक्रम पूर्ण करणे अवघड जाते. असा प्रतिसाद दिला. चार(२६.६६ टक्के) प्रतिसादकांना विद्यार्थ्यांची एकाग्रता भंग पावते असे मत व्यक्त केले. प्रत्येकी एक (६.६६) प्राचार्यांनी सुसंगत अध्यापनात व्यत्यय येतो, जादा तास घ्यावे लागतात असे सांगितले. दोन (१३.३३ टक्के) प्रतिसादक प्राचार्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की, जास्तीत जास्त ११(७३.३३ टक्के) प्राचार्यांनी तासिका कमी कालावधीच्या असल्याने अभ्यासक्रम पूर्ततेबाबतची समस्या व्यक्त केली. माध्यमिक शाळेतील तासिका ३० मिनिटांची असल्याने व त्याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाचे वेळापत्रक असल्याने सदर समस्या निर्माण होणे स्वभाविक आहे.

संशोधकाने अधिक माहितीसाठी प्राध्यापकांच्या मुलाखतीमध्ये कमी कालावधींच्या तासिकाविषयी प्रश्न विचारला असता बहुतांशी प्राध्यापकांनी जादा तास घेवून अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो असे उत्तर दिले. कमी कालावधीच्या तासिकेमुळे अध्यापनातील सुसंगता राहत नाही.

ग) कनिष्ठ महाविद्यालयातील व्यवस्थापनाविषयी माहिती :-


प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्थानिक पातळीवर दैनंदिन प्रशासन व्यवस्थीत चालते की नाही पाहण्यासाठी स्थानिक व्यवस्थापन समिती असते. त्यामध्ये प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी व संस्थेचे आवश्यक ते प्रतिनिधी असतात. ही समिती अर्थिक घटकावर नियंत्रण ठेवते. प्राध्यपकांच्या रजा, नेमणूका, बदल्या याविषयी विचार करते. अशी समिती प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाला असणे आवश्यक अंसते. तो एक शैक्षणिक प्रशासनाचा व नियाजनाचा घटक त्या समित्या प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात आहेत का व असल्यास त्यांचे कामकाज प्रशासनाच्या सोयीचे होते का हे जाणण्यासाठी प्रश्न क्र. २० ते २२ पर्यंत विचारले होते.

प्रश्न क्र. २० हा महाविद्यालयात स्थानिक समिती आहे काय असा होता. एकूण १५ प्रतिसादक प्राचार्यांपैकी १३ (८६.६६ टक्के) प्रतिसादकांनी होय उत्तर दिले. दोन( १३.३३ टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की, जास्तीत जास्त १३(८६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात स्थानिक समिती होती. शक्यतो स्थानिक समिती प्रत्येक संस्था अंतर्गत असते. परंतु २( १३.३३ टक्के) प्रतिसादकांनी नकारात्मक उत्तर दिले. त्यावरुन असे स्पष्ट होते की, त्यांना पुढील प्रश्नांची उत्तरे टाळण्यांचा प्रयत्न केला प्रत्यक्ष भेटीत सर्व कनिष्ठ महाविद्यालयात स्थानिक समिती असल्याचे दिसून आले.

प्रश्न क्र. २१ हा व्यवस्थापन स्थानिक समितीच्या बैठका वर्षातून किती वेळा होतात असा होता. प्रतिसादकाकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

## आलेख क्रमांक ५.०६
## स्थानिक समितीच्या बैठकांच्या माहितीचे वर्गीकरण
कोष्टक क्र. ५.१३



कोष्टक क्र. ५.१३

स्थानिक समितीच्या बैठकांच्या माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येक महिन्याला | ३ | २०.०० |
| २ | वर्षातून दोन वेळा | २ | १३.३३ |
| ३ | वर्षातून चार वेळा | ५ | ३३.३३ |
| ४ | वर्षातून सहा वेळा | ३ | २०.०० |
| ५ | अनुउत्तरित | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टाकावरुन असे दिसून येते की, तीन(२०.०० टक्के) प्रतिसादकांनी प्रत्येक महिन्याला इतर तिघांनी(२० टक्के) वर्षातून सहा वेळा असे उत्तर दिले. पाच(३३.३३ टक्के) प्रतिसादकांनी वर्षातून चार वेळा बैठका होतात. असे उत्तर दिले. दोन(१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की, वर्षातून चार वेळा बैठका होतात असे उत्तर देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या पाच(३३.३३ टक्के) अधिक होती. इतर ८(५३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये स्थानिक व्यवस्थापन समित्या वर्षातून दोन ते सहावेळा बैठका होत असल्याचे दिसून येते. यावरुन १५ पैकी १३ कनिष्ठ महाविद्यालयात स्थानिक व्यवस्थापन समित्याच्या बैठका त्यांच्या गरजानुसार होतात त्यामध्ये एकसारखेपणा नाही वास्तविक स्थानिक समितीची बैठक दर महिन्याला होणे अधिक चांगले दोन कनिष्ठ महाविद्यालयात बैठका घेतल्या जात नाहीत म्हणजे स्थानिक व्यवस्थापन समितीला किंमतच दिली जात नाही ही चांगल्या प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नाही.

प्रश्न क्र. २२ हा समितीच्या सदस्यामध्ये व प्राचार्यामध्ये मतभेद होतात का असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

पाच (३३.३३ टक्के) प्रतिसादकांनी मतभेद होत नाहीत असे सांगितलेच प्रत्येकी १ (६.६६ टक्के) प्रतिसादकांनी मतभेद मतभेदाचा प्रसंग येत नाही, सहसा असा प्रसंग उद्‌भवत नाही, कायदेशीर गोष्टींना प्रतिबंध नाही असे सांगितले. सात (४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.


यावरुन असे दिसून येते की, ८(५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी मतभेद नसल्याचे सांगितले. सात(४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही. त्यानी माहिती लपविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. संशोधकाने भेटीद्वारे माहिती मिळविताना संस्थेतील वातावरणाचे निरीक्षण केले असता मतभेदाचे वातावरण दिसून आले नाही. जरी किरकोळ मतभेद असले तरी ते लपविण्याकडेच जास्त कल दिसून येतो.

घ) प्राध्यापकांच्या नियोजन व प्रशासनासंबंधी माहिती

शैक्षणिक प्रशासनात प्राध्यापक हा घटक महत्वाचा आहे. त्यांच्या योग्य त्या शैक्षणिक पात्रतेनुसार नेमणूका होणे त्यांचे प्रशिक्षण झालेले असतणे, त्यांना सेंवातर्गत प्रशिक्षण मिळणे त्यांनी अध्यापनाचे नियोजन करुन प्रभावी अध्यापन करणे महत्वाचे असते. ही माहिती जाणून घेण्यासाठी या विभागातील प्रश्न क्र. २३ ते ४० विचारले होते.

प्रश्न क्र. २३ हा प्राध्यापकांची शैक्षणिक पात्रतेनुसार संख्या किती आहे. असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

## आलेख क्रमांक ५.०५
## प्राध्यापकांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार संख्याचे वर्गीकरण
कोष्टक क्र. ५.१४



कोष्टक क्र. ५.१४

प्राध्यपकांच्या संख्याचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्राध्यापक संख्या | पतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एम.ए.बी.एड. | १०० | ६६.६६ |
| २ | एम.एस्सी.बी.एड. | ३८ | २५.३३ |
| ३ | एम.कॉम.बी.एड. | ०४ | २.६६ |
| ४ | एम.ए.एम.पी.एड. | ०२ | १.३३ |
| | एकूण | १४४ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, १५ कनिष्ठ महाविद्यालयातून एम. ए.बी.एड. प्राध्यापकांची एकूण संख्या १००( ६६.६६ टक्के) होती. एम.एस्सी.बी. एड. प्राध्यापकांची संख्या ३८( २५.३३ टक्के) होती. एम.कॉम.बी.एड.प्राध्यापकांची एकूण संख्या ४( २.६६ टक्के) होती व एम.ए.एम.पी.एड. प्राध्यापकांची एकूण संख्या २ ( १.३३ टक्के) होती.

वरील माहितीवरुन असे दिसून येते की, एम.ए.बी.एड्. प्राध्यापकांची संख्या सर्वाधिक १००( ६६.६६) होती. बार्शी तालुक्यातील एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयात सर्वच ठिकाणी कला शाख होती. त्यामुळे एम.ए.बी.एड. प्रध्यापकांची संख्या सर्वाधिक होती. विज्ञान शाखेची ४( २६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये असल्याने प्राध्यापक संख्या कमी ३८( २५.३३ टक्के) होती. वाणिज्य शाखा असलेले एकच कनिष्ठ महाविद्यालय असल्याने प्राध्यापक संख्याही फारच कमी ४( २.६६ टक्के) होती व शा. शिक्षण विभागासाठी केवळ २( १.३३ टक्के) प्राध्यापक होते. शाखांनुसार विचार केला असता प्राध्यापक संख्या पुरेशी होती. शारीरिक शिक्षकाची संख्या कमी असल्याचे दिसून आले तरी भेटी दिल्या असता माध्यमिक शाळेचे शारीरिक शिक्षणाचे शिक्षकच कनिष्ठ महाविद्यालयाच्या

विद्यार्थ्यांचे शारीरिक शिक्षण घेत होते तर वरिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षक कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षणाचे तास घेत होते. कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र शारीरिक शिक्षक नव्हते असे दिसून आले.

एकूण कला विज्ञान व वाणिज्य शाखांमध्ये पुरेसे शैक्षणिक पात्रता असलेले प्राध्यापक आढळून आले. परंतु बहुतेक ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र प्राध्यापक कमी होते.

प्रश्न क. २४ हा प्राध्यापक आपल्या अध्यापनाचे नियोजन करतात काय असा होता. एकूण १५ प्रतिसादांपैकी १४(९३.३३ टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले. एका(६.६६ टक्के) प्रतिसादकाने कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की जास्तीत जास्त प्रमाणात प्राध्यापकांकडून आपल्या अध्ण्यापन विषयाचक नियोजन करुन घेतले जाते. एका प्रतिसादकाने उत्तर दिले नाही. याचा अर्थ नियोजन केले जात नाही असा होतो. तरी जास्तीत जास्त प्राध्यापक अध्यापनाचे नियोजन करतात असा बहुतांश प्रतिसाद होता.

कनिष्ठ महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या असता निरीक्षणातून असे दिसून आले की बहुतेक प्राध्यापक अध्यापनाचे जुजबी स्वरुपात नियोजन करतात. यावरुन असे स्पष्ट होते की, वास्तविक माहिती स्पष्ट न करता आदर्श चित्र दाखविल्याचे दिसून आले.

प्रश्न क्र. २५ हा प्राध्यपकांनी नियोजन केले पाहिजे यासाठी कोणती उपाययोजना करता असा होता. हयावरुन आलेली माहिती खालील कोष्टकात दिली आहे.

कोष्टक क्र. ५.१५

नियोजन करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक सं. | प्रतिसादक शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येक आठवडयाला अहवाल मागतो | ४ | २६.६६ |
| २ | विद्यार्थ्यांची सदर विषयाची चाचणी घेतली जाते. | ९ | ६०.०० |
| ३ | अध्यापनातील कमकुवत बाबींविषयी सूचना दिली जाते | ७ | ४६.६६ |
| ४ | नियोजनाचे महत्व पटवून सांगितले जाते. | ८ | ५३.३३ |
| ५ | अनुत्तरित | २ | १३.३३ |
| | एकूण | ३० | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की ४(२६.६६ टक्के) प्रतिसादाकांनी प्रत्येक आठवडयाला अध्यापनाचा अहवाल मागतो असे उत्तर दिले.नऊ (६०टक्के) प्रतिसादाकांनी विद्यार्थ्यांची सदर विषयाची चाचणी घेतली जाते असे उत्तर दिले. सात (४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी अध्यापनातील कमकुवत बाबींविंषयी सूचना दिली जाते असे उत्तर दिले. आठ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी नियोजनाचे महत्व पटवून सांगितले जाते असे उत्तर दिले तर २ (१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की, विंविध सूचना देऊन व चाचणीद्वारे नियोजन करुन घेतल्याची माहिती मिळते. परंतु २(१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही. याचा अर्थ ते कोणतेही उपाय करत नाहीत त्यांनी प्राध्यापकावर जाबाबदारी सोपविल्याचे दिसून येते.

प्रश्न क्र. २८ हा वेळापत्रकाप्रमाणे कामकाज चालविण्यास कोणत्या अडचणी येतात असा होता. प्रतिसादकांकडून खालीलप्रकारे माहिती मिळाली. एकूण १५ प्रतिसादकापैकी ७(४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी अडचणी येत नाहीत असे उत्तर दिले. बाकी प्रत्येकी १(६.६६ टक्के) प्रतिसादकांनी तासिका कमी पडतात, माध्यमिकच्या तासिका कमी कालावधीच्या असतात, वर्ग खोल्या कमी पडतात, प्राध्यापकांच्या अचानक रजांमुळे अडचणी येतात, वेळ अपुरा पडतो, दोन अस्थापनाची वेळ एकच येणे, अशी उत्तरे दिली. तीन (२० टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की एकूण १५ प्रतिसादकांपैकी ७(४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी वेळापत्रकानुसार कामकाजासंबंधी अडचणी येत नाहीत म्हणजेच नियोजना प्रमाणे कार्यवाही केली जाते, असे सांगितले. तीन (२० टक्के) प्रतिसादाकांनी उत्तर देण्याचे टाळले. याचा अर्थ कोणत्या ना कोणत्या अडचणी येतात पण लपविण्याचा प्रयत्न केला दिसून आला. पाच(३३.३३ टक्के) प्रतिसादकांनी विविध स्वरुपाच्या समस्या मांडल्या.

या समस्या माध्यमिक शाळेच्या तासिका कमी कालावधीच्या असणे,इमारत अपुरी, प्राध्यापकांच्या एकाच वेळी रजा, वेळापत्रक विषयानुसार बनविणे अडचणीचे अशा समस्या विचार करण्यायोग्य समस्या आहेत व त्या प्रत्यक्ष जाणवल्या.

प्रश्न क्र. २९ हा त्या अडचणीवर कोणती उपाय योजना करता असा होता. प्रतिसादकांनी खालीलप्रमाणे माहिती दिंली आहे.

एकूण १५ प्रतिसादकांपैकी ३(२० टक्के) प्रतिसादकांनी ज्यादा तास घ्यावे लागतात असे उत्तर दिले. प्रत्येकी १(६.६६ टक्के) प्रतिसादकांनी उच्च माध्यमिकचे स्वतंत्र वेळापत्रक केले,तासांची पर्यायी व्यवस्था केली जाते. आपापसात समायोजन करतो, सुट्टीच्या कालावधीत ज्यादा तास घेतो. अशी उत्तरे दिली. सहा (४० टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की ६(४० टक्के) प्रतिसादकांनी विविध उपाययोजना केल्या जातात असे सांगितले, संशोधकाने या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्राध्यापनकांच्या मुलाखती घेतल्या असता असे दिसून आले की, प्राध्यापक ज्यादा तास घेऊन अभ्यसक्रम पूर्ण करतात. माध्यमिकशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील तासिका लहान असतात. त्याकरिता कनिष्ठ महाविद्यालयाचे वेगळे वेळापत्रक असावे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ३० हा अभ्यासक्रम नियोजित कालावधीमध्ये पूर्ण होतो काय असा होता.प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीनुसार एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी १३ (८६.६६ टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले. दोन (१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की, अभ्यासक्रम नियोजित वेळेत पूर्ण केला जातो. या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने प्रत्यक्ष भेटी व निरीक्षण केले असता असे दिसून आले की ज्यादा तास घेऊन अभ्यासक्रम पूर्ण केला जाते. ज्यांनी नियोजित कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण होत नाही असे उत्तर दिले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे काही कनिष्ठ महाविद्यालयात काही विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण होत नाही.

प्रश्न क्र. ३१ हा प्राध्यापक नियुक्तीच्या वेळी कोणत्या अडचणी येतात असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिले आहे.

कोष्टक क्र. ५.१६

नियुक्तीच्या वेळी येणाऱ्या अडचणीविषयक माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादकाचे स्वरुप | प्रतिसादक सं. | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अडचणी येत नाहीत | ४ | २६.६६ |
| २ | ग्रामीण भागात अध्यापनात तज्ञ प्राध्यापक येत नाहीत. | १ | ६.६६ |
| ३ | अर्धवेळ तासिका तत्वावर नेमणुकी मुळे प्राध्यापक उपलब्ध होत नाहीत. | १ | ६.६६ |
| ४ | वर्गवारीची समस्या येते. | २ | १३.३३ |
| ५ | ऊर्दू माध्यमाचे उमेदवार शक्यतो मिळत नाहीत. | १ | ६.६६ |
| ६ | अनुसुचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत. | २ | १३.३३ |
| ७ | तज्ञांकडून निवड होत नाही. | १ | ६.६६ |
| ८ | इंग्रजी अर्हता प्राप्त उमेदवार मिळत नाहीत. | १ | ६.६६ |
| ९ | अनुत्तरित | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ४(२६.६६ टक्के) प्रतिसादकांनी अडचणी येत नाहीत असे सांगितले प्रत्येकी २(१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी वर्गवारीची समस्या येते, अनुसुचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत असे सांगितले तर दोन प्रतिसादकांनी उत्तर दिले नाही. प्रत्येकी एका(६.६६ टक्के) प्रतिसादकाने ग्रामीण भागात अध्यापनात तज्ञ प्राध्यापक येत नाहीत, अर्धवेळ व तासिका तत्वावर नेमणुकीमुळे प्राध्यापक उपलब्ध होत नाहीत. ऊर्दू माध्यमाचे

उमेदवार शक्यतो मिळत नाहीत, तज्ञांकडून निवड होत नाही, इंग्रजी अर्हता प्राप्त उमेदवार मिळत नाहीत असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की अडचणी येत नाहीत म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ४(२६.६६ टक्के) सर्वाधिक होती. नऊ(८० टक्के) प्रतिसादकांनी विविध अडचणी सांगितल्या २(१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

या संदर्भात संस्था प्रमुखांशी चर्चा केली असता त्यांनी अनुसुचित जाती जमातीचे तज्ञ प्राध्यापक उपलब्ध होत नाहीत असे सांगितले. तडजोड करावी लागते असे सांगितले. संशोधकाने प्राध्यापकाच्या मुलाखती घेतल्या असता त्यांनी अर्धवेळ व तासिका तत्वावरच्या नियुक्तीबद्दल निराशा व्यक्त केली. एकंदर नियुक्तीच्या वेळी या प्रशासकीय स्वरुपाच्या समस्या येतात. यातील काही समस्या महत्वाच्या वाटतात. राखीव कोटा ठेवलेल्या त्या त्या वर्गाच्या आरक्षणातील प्राध्यापक मिळणे कठीण जाते, त्यांच्या जाहिरातीची परवानगी मिळविण, कोटा जाहीर करणे, अनुशेष भरणे इत्यादी अनेक अडचणी आल्याने प्राध्यापक वेळेवर भरणे कठीण जाते. तासिका तत्वावर किंवा अर्धवेळ प्राध्यापक नेमण्यामध्येही समस्या येतात. जबाबदारीची विभागणी करता येत नसल्याने प्रशासनात शिथीलता येते. यातील एक समस्या इंग्रजी विषयातील योग्य अर्हता प्राप्त प्राध्यापक मिळत नाही ही समस्या खरी वाटत नाही. तसेच तज्ञांकडून निवड होत नाही या म्हणण्यामध्येही शासकीय परवागीला विलंब लागणे हे कारण आहे.

प्रश्न क्र. ३२ हा प्राध्यापकाची नियुक्ती करताना आपला सल्ला घेतला जातो काय असा होता. त्या प्रश्नातून खालील माहिती मिळाली. एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयांतील १४(९३.३३ टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले. एका(६.६६ टक्के) प्रतिसादकाने नाही असे उत्तर दिले.

यावरुन असे म्हणता येईल की प्राध्यापकांच्या नियुक्तीच्या वेळी बहुसंख्य प्राचार्यांच्या सल्ला घेतला जात होता. ही प्रशासनाच्या दृष्टीने चांगली बाब होती. एका(६.६६ टक्के) प्रतिसादकाने नाही असे उत्तर दिले. यासंदर्भात प्रत्यक्ष भेटी

दिल्यानंतर असे आढळून आले की एक कनिष्ठ महाविद्यालय विना अनुदानित होते व त्याच प्राचार्यांनी नाही असे उत्तर दिले जे योग्य होते. एकंदरित ही समाधारक बाब आहे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ३३ हा सल्ला न घेतल्याने काणत्या समस्या निर्माण होतात असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.१७

सल्ला न घेतल्याने निर्माण होणाऱ्या समस्यांचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सखोल अध्यापन करणारे अनुभवी प्राध्यापक मिळत नाहीत. | १ | ६.६६ |
| २ | व्यवस्थापनात व्यत्यय येण्याची शक्यता असते. | १ | ६.६६ |
| ३ | तज्ञ प्राध्यापक मिळत नाहीत | २ | १३.३३ |
| ४ | अडचणी येत नाहीत | ३ | २०.०० |
| ५ | अनुत्तरित | ८ | ५३.३३ |
|  | एकूण | १५ |  |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की प्रत्येकी एका (६.६६ टक्के) प्रतिसादकांनी सखोल अध्यापन करणारे अनुभवी प्राध्यापक मिळत नाहीत, व्यवस्थापनात व्यत्यय येण्याची शक्यता असते अशी उत्तरे दिली.
दोन (१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी तज्ञ प्राध्यापक मिळत नाहीत असे सांगितले.
तीन (२० टक्के) प्रतिसादकांनी अडचणी येत नाहीत असे सांगितले.
आठ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिलेले नाही.

यावरुन असे दिसून येते की, उत्तर न देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ८(५३.३३ टक्के) ही सर्वाधिक होती. तीन(२०टक्के) प्रतिसादकांनी अडचणी येत नाहीत असे उत्तर दिले. चार (२६.६६ टक्के) प्रतिसादकांनी वरील अडचणी सांगितल्या.


यापूर्वीच्या प्रश्न क्र.३२ वरुन एकूण १५ पैकी १४ प्राचर्याचा सल्ला घेतला जात होता. त्यामुळे सल्ला न घेतल्याने कोणत्या समस्या निर्माण होतात या प्रश्न क्र. ३३ ला ४ प्राचार्यांनी प्रतिसाद दिला. त्यांचे म्हणणे चांगले गुणवत्ताधारक प्राध्यापक न मिळणे, प्राचार्यांच्या प्रशासनात अडथळा येणे हया समस्या निर्माण होऊ शकतात.

प्रश्न क्र. ३४ हा प्राध्यापकांच्या बदल्या आपल्या सल्ल्याने होतात काय ? असा होता. एकुण १५ प्रतिसादकांपैकी ११(७३.३३ %) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले तर १(६.६६ %) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले ३(२०.०० %) प्रतिसादकांनी काहीही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की प्राध्यापकांच्या बदल्या संदर्भात बहुतेक प्राचार्यांचा सल्ला घेतला जातो. परंतू ३(२०.०० %) प्रतिसादकांनी काहीही उत्तर दिले नाही. याचा अर्थ १५ पैकी ४(२६.६६ %) महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या सल्ल्याशिवाय संस्था बदल्या करते.

संशोधकाने या संदर्भात अधिक माहिती संकलित करण्याकरिता प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्या असता बहुतेक प्राध्यापकांनी बदलीचा प्रश्न येत नाही असे सांगितले. काहींनी प्राचार्यांचा सल्ला घेतला जातो असे सांगितले. संशोधकाला असे वाटते की प्राचार्य व संख्या प्रतिनिधी यांच्यातील आंतरक्रिया चांगली असायला पाहिजे प्राचार्यांना त्यांच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांचे गुणदोष माहित असतात. तसेच विषयानुसार चांगल्या प्राध्यापकांची त्यांना गरज असते. शिवाय प्राचार्यांच्या

## आलेख क्रमांक ५.०६
## प्राध्यापकांच्या बदल्यांचे वर्गीकरण
कोष्टक क्र. ५.१८



सल्ल्याने बदल्या केल्यास प्राध्यापकावर वचक राहतो व प्रशासनात शिस्त येते असे संशोधकाला वाटते.

बदल्या करणे हा भाग प्रशासनाचा भाग असला तरी बदल्या शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला करणे चांगले त्यामुळे सुरुवातीपासुन तेच शिक्षक त्या विद्यार्थ्यांना शिकवू शकतात. अध्यापनात सुसूत्रता राहते. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाची साखळी तुटत नाही. पण बदल्या वर्षाच्या मध्येच केल्यास प्राध्यापकांना गैरसोईचे होते. अध्यापनात सुसूत्रता राहत नाही. प्राध्यापकाच्या अध्यापनात तळमळ न राहण्याची शक्यता असते. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाची साखळी तुटते अश्या समस्या निर्माण होतात म्हणून किती कनिष्ठ महाविद्यालयात वर्षारंभी बदल्या होतात हे जाणण्यासाठी प्रश्न ३५ वा विचारला होता.

प्रश्न ३५ वा हा बदल्या वर्षारंभी का मध्येच केल्या जातात ? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितेचे वर्गीकरण खालील कोष्टकात केलेले आहे.

कोष्टक क्र. ५.१८

बदल्यांचे वर्गीकरण

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वर्षारंभी | १० | ६६.६६ |
| २ | मध्येच | १ | ६.६६ |
| ३ | केव्हाही गरजेप्रमाणे | ३ | २०.०० |
| ४ | अनुत्तरित | १ | ६.६६ |
| | | १५ | |

वरील कोष्टकाचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की १०(६६.६६टक्के) प्रतिसादकांनी प्राध्यापकांच्या बदल्या केल्या जातात असे उत्तर दिले.एक (६.६६ टक्के) प्रतिसादकांने मध्येच केल्या जातात असे उत्तर दिले. तीन (२०टक्के) केव्हाही गरजेप्रमाणे असे उत्तर दिले.एका (६.६६ टक्के) प्रतिसादकाने कोणतेही उत्तर दिले नाही.

या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने प्राध्यापकांच्या मुलाखतीमध्ये बदली होते असा प्रश्न विचारला असता जास्तीत जास्त प्राध्यापकांनी वर्षारंभी केल्या जातात असे उत्तर दिले. काही प्राध्यापकांनी संस्थेची एकच शाखा असल्याने बदलीचा प्रश्नच येत नाही असे उत्तर दिले. कनिष्ठ महाविद्यालयाची शाखा एकच असलेल्यांची संख्या अधिक होती.

यावरुन बहुतेक कनिष्ठ महाविद्यालयातून प्राध्यापकांच्या बदल्या वर्षारंभी होतात ही चांगली बाब आहे पण राहिलेल्या ५ (३३.३३ टक्के ) कनिष्ठ महाविद्यालयात बदल्या केंव्हाही गरजेप्रमाणे होतात. हे योग्य नाही असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ३६ हा बदली वर्षाच्या मध्येच झाल्यावर त्याचा अध्यापनावर काय परिणाम होता ? असा होतो. प्रतिसादकांकडुन मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.१९


बदली मध्येच झाल्यावर होणाऱ्या परिणामाचे वर्गीकरण

| अ.क्र. | परिणामाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | त्या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण होत नाही | ७ | ४६.६६ |
| २ | प्राध्यापकाला नवीन ठिकाणी जुळवून घेणे अवघड जाते. | ८ | ५३.३३ |
| ३ | वर्ग नियंत्रणाची समस्या निर्माण होते | ७ | ४६.६६ |
| ४ | अनुत्तरित | ४ | २६.६६ |
| | एकूण | २६ | |

**आलेख क्रमांक ५.०७**

**अध्यापनाचे निरीक्षण विषयक माहितीचे वर्गीकरण**

कोष्टक क्र. ५.२०



वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की ७ (४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी अभ्यासक्रम पूर्ण होत नाही असे उत्तर दिले. आठ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी प्राध्यापकाला नवीन ठिकाणी जुळवून घेणे अवघड जाते असे उत्तर दिले. सात (४६.६६ %) प्रतिसादकांनी वर्ग नियंत्रणाची समस्या निर्माण होते असे उत्तर दिले. चार (२६.६६%) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे स्पष्ट होते की बहुतेक प्रतिसादकांनी अनिष्ट परिणामच सांगितले.चार (२६.६६%) प्रतिसादकांनी उत्तर दिले नाही ते देखील वरील विधानाशी सहमत असावेत असे संशोधकाला वाटते. अभ्यासक्रम वेळेत न संपणे, प्राध्यापकांना नवीन ठिकाणी जुळवून घेणे अवघड जाते, त्याचा अध्यापनावर परिणाम होतो, वर्ग नियंत्रणाची समस्या निर्माण होणे इत्यादी समस्या निर्माण होतात. म्हणून सर्व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्राध्यापक नेमणुका, बदल्या शैक्षणिक वर्षारंभी व्हाव्यात असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ३७ हा आपण प्राध्यापकांच्या अध्यापनाचे वर्षातून किती वेळ निरीक्षण करता ? असा होता प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.२०

अध्यापनाचे निरीक्षण विषयक माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | दर आठवडयाला | ३ | २०.०० |
| २ | दर महिन्यातुन | ५ | ३३.३३ |
| ३ | वेळ मिळेल तेव्हा | ६ | ४०.०० |
| ४ | निरीक्षण करीत नाही | १ | ६६.६६ |
| | | १५ | |

वरील कोष्टकरावरुन असे दिसून येते की ३(२६.६६ टक्के) प्रतिसादक आठवडयाला निरीक्षण करतात. पाच (३३.३३ टक्के) प्रतिसादक दर महिन्यातुन निरीक्षण करतात. सहा (४० टक्के) प्रतिसादक वेळ मिळेल तेव्हा निरीक्षण करतो असे उत्तर दिले. एका(६.६६ टक्के) प्रतिसादकाने निरीक्षण करत नाही असे सांगितले.

यावरुन असे दिसून येते की ८(५३.३३ टक्के) प्राचार्य प्राध्यापकाच्या अध्यापनाचे निरीक्षण नियमित करतात. सहा(४०.४४ टक्के) प्राचार्य वेळ मिळेल तेव्हा करतात, हे त्यांचे म्हणणे मोघम वाटते. तसेच एका(६.६६ टक्के) प्राचार्यांनी निरीक्षण करत नसल्याचे सांगितले.

यावरुन ७(४६.६६ टक्के) प्राचार्य निरीक्षणाच्या बाबतीत दक्ष असल्याचे दिसून येत नाही. संशोधकाने प्रत्यक्ष भेटी, निरीक्षण व मुलाखती व्दारेही बहुतेक प्राचार्य निरीक्षण करतात असे दिसून आले. पण त्यांच्या निरीक्षणात सातत्य नाही ही योग्य गोष्ट नाही. प्राचार्यांनी प्राध्यापकाच्या अध्यापनाचे निरीक्षण केले असता प्राध्यापक काळजीने तयारीने अध्यापन करतात, प्राचार्य त्यांना मार्गदर्शन करु शकतात.

प्रश्न क्र. ३८ हा प्राध्यापक खाजगी क्लास घेतात काय ? असा होता. त्यावरुन एकुण १५ प्रतिसादकांपैकी सर्वच प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की एकाही कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक खाजगी क्लास घेत नव्हते. शासनाने सेवेत असणाऱ्या प्राध्यापकांसाठी खाजगी क्लासला बंदी घातल्याने प्राध्यापक खाजगी क्लास घेत नाही असे दिसून आले. या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने प्रत्यक्ष भेटी देवून, निरीक्षण व मुलाखती घेतल्या त्यावेळी देखील प्राध्यापकांनी खाजगी क्लास घेत नसल्याचे सांगितले. परंतू सेवेत नसणारे काही पदवीधर क्लास घेतात.

शासनाने बंदी घातल्यानेच खाजगी क्लास बहुतांशाने बंद आहेत. काही प्राध्यापक इतर खाजगी क्लासमधून गुपचूप अध्यापन करतात पण वर्गात ज्या

विद्यार्थ्याला पक्षपाती वागणूक प्राध्यापकांकडून दिली जात होती ती आता बंद झाली आहे. ही चांगली गोष्ट आहे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ३९ हा खजगी क्लास घेत असल्यास त्याचा वर्ग अध्यापनावर कोणता परिणाम होतो ? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.२९

खाजगी क्लासचा वर्ग अध्यापनावर होणाऱ्या परिणामाची माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वर्ग अध्यापन काळजीपूर्वक केले जात नाही | १ | ६.६६ |
| २ | क्लासला न येणाऱ्या विद्यार्थ्यांवर प्राध्यापक कडक शिस्त ठेवतात. | १ | ६.६६ |
| ३ | विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव केला जातो. | १ | ६.६६ |
| ४ | अभ्यासक्रम पूर्ण केला जात नाही | १ | ६.६६ |
| ५ | अनुत्तरित | ११ | ७३.३३ |
| | | १५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की एक (६.६६ टक्के) प्रतिसादकांनी वर्ग अध्यापन काळजीपूर्वक केले जात नाही, क्लासला न येणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक शिस्त ठेवतात, विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव केला जातो. अभ्यासक्रम पूर्ण केला जात नाही अशी उत्तरे दिली. अकरा (७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की जास्तीत जास्त ११(७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही. याचा अर्थ बहुतेक ठिकाणी खाजगी क्लास बंद होते.

संशोधकाने या संदर्भात भेटी व निरीक्षणाद्वारे माहिती मिळविताना क्लास घेत नसल्याचे दिसून आले. एकंदर ही समाधानाची बाब आहे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ४० हा त्यासाठी आपण कोणते उपाय योजाल ? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.
तेरा(८६.६६ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही. प्रत्येकी एका (६.६६ टक्के) प्रतिसादकांनी खाजगी क्लासला बंदी घातली आहे. खाजगी क्लास कोणीही घेत नाही असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की खाजगी क्लास कोणताही प्राध्यापक घेत नसल्याने त्यावर उपाय योजण्याची आवश्यकता नसल्याचे दिसून आले.

संशोधकाने या संदर्भात संस्था प्रमुखाशी चर्चा केली असता त्यांनी असे सांगितले की खाजगी क्लास सेवेत नसणारे लोक घेतात. आमचे प्राध्यापक खाजगी क्लास घेत नाहीत त्यामुळे कोणत्याही प्रकारची समस्या येत नाही. ही अत्यंत समाधानकारक बाब आहे असे संशोधकाला वाटते.

च) विद्यार्थी प्रशासनाविषयी माहिती :-

कनिष्ठ महाविद्यालयातील प्रशासन व नियोजनाचा अभ्यास करत असताना मानवी व भौतिक घटकांचा सामावेश केला जातो. मानवी घटकामध्ये संस्थाचालक, प्राचार्य, शासकीय अधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालकांचाही समावेश केला जातो यांच्या अंतरक्रियेतूनच प्रशासन व नियोजन यशस्वी होऊ शकते. प्रस्तूत संशोधनामध्ये वरील घटकांसंदर्भात विचार करणे आवश्यक आहे. महाविद्यालयाचा मुख्य गाभा म्हणजे विद्यार्थी मानला जातो. विद्यार्थी प्रशासनाविषयी माहितीचा अभ्यास याविभागात करण्यात आला असून विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी माहिती गोळा करण्यात आली आहे.

प्रश्न क्र. ४१ हा आपल्या महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखांचे एच.एस.सी. चे एप्रिल १९९८ मधील निकाल किती टक्के लागले ? असा

होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.२२

एप्रिल १९९७,१९९८ मधील एच.एस.सी. परिक्षांच्या निकालाच्या माहितीचे वर्गीकरण

| अ क्र. | प्रतिसादक कनिष्ठ महाविद्यालयाचे | एप्रिल १९९७ | | | एप्रिल १९९८ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नांव | कला | वाणिज्य | विज्ञान | कला | वाणिज्य | विज्ञान |
| १. | शिवाजी महाविद्यालय,बार्शी. | ५४.०० | - | ७०.०० | ६७.०० | - | ७८.०० |
| २. | महाराष्ट्र (उ.मा.) विद्यालय बार्शी. | ७९.९० | - | ६५.४० | ७५.४० | - | ७३.०० |
| ३. | बी.पी.सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी. | ८९.०० | ५६.०० | - | ८७.०० | ६१.०० | - |
| ४. | श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी. | ३५.०० | - | ५०.०० | ४०.०० | - | ५५.०० |
| ५. | अभिनव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बार्शी. | ५०.०० | - | - | ६५.०० | - | - |
| ६. | ॲंग्लो उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,बार्शी. | ४०.४० | - | - | ६९.८० | - | - |
| ७. | मित्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय ,मळेगाव. | ४७.६० | - | - | ५०.०० | - | - |
| ८. | कर्मवीर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय ,चारे. | ५६.२० | - | - | ६०.३० | - | - |
| ९. | एम.पी.ए.एन. माध्यमिक व (उ.मा.) स्कूल,गौडगाव. | २०.६० | - | - | ८६.७० | - | - |
| १० | ॲड.दिलीपराव सोपल कनिष्ठ महाविद्यालय, सुर्डी. | २५.०० | — | - | ७५.०० | - | - |
| ११ | शेळगाव हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, शेळगाव. | ८०.०० | - | - | ९२.०० | - | - |
| १२ | विद्यामंदीर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,वैराग. | ३८.३० | - | ६८.८० | ७७.५० | - | ९२.७० |
| १३ | कन्या कनिष्ठ महाविद्यालय, वैराग. | ३९.५० | - | - | ७९.८० | - | - |
| १४ | विद्यासाधना ज्युनिअर कॉलेज,वैराग. | ४८.०० | - | - | ५४.०० | - | - |
| १५ | सर्वोदय विद्यामंदीर,पांगरी. | ५०.०० | - | - | ६०.०० | - | - |
| | एकूण | ७५३.५० | ५६.०० | २५४.०० | १०३९.५० | ६१.०० | २९८.७० |
| | सरासरी | ५०.२० | ५६.०० | ६३.५५ | ६९.३० | ६१.०० | ७४.७० |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की बार्शी तालूक्यातील एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी ४( २६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान शाखा

होत्या एक (६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य शाखा होती व १५(१००.०० टक्के) म्हणजे सर्वच कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखा होती. त्यातील सर्व शाखांतील १९९७ व १९९८ मधील निकालांचे निरीक्षणावरुन असे दिसून येते की एप्रिल १९९७ मध्ये कला शाखेचा सरासरी निकाल ५०.२० टक्के होता, वाणिज्य शाखेचा निकाल ५६.०० टक्के होता, विज्ञान शाखेचा निकाल ६३.५५ टक्के होतो. एप्रिल १९९८ मधील कला शाखेचा निकाल ६.९ टक्के होता, वाणिज्य शाखेचा निकाल ६१.०० टक्के होता व विज्ञान शाखेचा निकाल ७४.७ टक्के होता.

यावरुन असे दिसून येते की एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयात कला, विज्ञान व वाणिज्य या तिनही शाखांचे निकाल एप्रिल १९९७ च्या तुलनेत १९९८ मध्ये वाढलेले दिसून आले. बार्शी तालुक्यात विज्ञान शाखांचे प्रमाण कमी ४(२६.६६ टक्के) असले तरी निकाल समाधानकारक होते. वाणिज्य शाखा एकच होती पण निकाल सर्वसाधारण बरा होता.कला शाखा प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात होती व सरासरी निकाल ठीक होता.

प्रश्न क्र. ४२ हा हे निकाल समाधानकारक वाटतात का ? असा होता. प्रतिसादकाकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

आठ(५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले. सात(४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले. यावरुन असे दिसून येते की होय असे उत्तर देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या अधिक होती.

एकंदर ८(५३.३३ टक्के) प्रतिसादक एप्रिल १९९७ व १९९८ च्या निकालावर समाधानी होते. परंतू ७(४६.६६ टक्के) या निकालावर समाधानी नव्हते. याचाच अर्थ असा की जे प्रतिसादक असमाधानी होते त्यांना आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील निकालांमध्ये लक्षणीय वाढ व्हावी असे वाटते. त्यानुसार प्रतिसादक प्रयत्नशील होते असे आढळून आले. ही समाधानकारक बाब आहे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ४३ हा हे निकाल असमाधानकारक वाटत असल्यास आपण कोणते उपाय योजाल ? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.२३

असमाधानकारक निकालांवरील माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | जादा तासांचे आयोजन करतो | १० | ६६.६६ |
| २ | पालकांना विद्यार्थी प्रगतीविषयी वारंवार सूचना देतो | ८ | ५३.३३ |
| ३ | विद्यार्थी वर्तनाविषयी नोंदी ठेवतो | ७ | ४६.६६ |
| ४ | गुणवंत विद्यार्थ्यांना योग्य ते बक्षीस देतो | ९ | ६०.०० |
| ५ | अनुत्तरित | ४ | २६.६६ |
| | एकूण | ३८ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की १०(६६.६६ टक्के) प्रतिसादक प्राचार्यांनी जादा तासांच आयोजन करतो असे सांगितले. आठ(५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी वारंवार सूचना देतो असे उत्तर दिले. सात(४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी विद्यार्थी वर्तन विषयी नोंदी ठेवतो असे सांगितले. नऊ (६० टक्के) प्रतिसादकांनी गुणवंत विद्यार्थ्यांना योग्य ते बक्षीस देतो असे सांगितले. चार( २६.६६ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की निकाल सुधारण्यासाठी बहुसंख्य ११(७३.३३ टक्के) प्राचार्य कोणत्या ना कोणत्या स्वरुपाचे प्रयत्न करत होते.परंतू ४( २६.२६ टक्के) प्राचार्य कोणतेही प्रयत्न करत नव्हते असे आढळून आहे. ही बाब असमाधानकारक वाटते.या संदर्भात अधिक माहिती गोळा करण्यासाठी संशोधकाने प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये भेटी देऊन निरीक्षण केले. तसेच मुलाखती

घेतल्या त्यावेळी असे आढळून आहे की आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील निकाल वाढविण्यासाठी कला शाखेमध्ये इंग्रजी, विज्ञान शाखेमध्ये विज्ञान व गणित तर वाणिज्य शाखेमध्ये अकौटंसी या विषयांचे सुट्टीत जादा तास घेतले जात होते. तसेच काही कनिष्ठ महाविद्यालयात सकाळी कॉलेज असते व दुपारी जादा तास घेतले जातात. जास्तीत जास्त निकाल लावण्यासाठी प्रयत्न केले जात होते, त्याचप्रमाणे पालकांशी चर्चा विद्यार्थी वर्तन नोंद व योग्य बक्षिसांच्या सहाय्याने निकाल सुधारण्याकरिता प्रयत्न केले जात होते.

प्रश्न क्र. ४४ हा अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी काय करता ? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.२४

अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांवर केलेल्या उपायांचे वर्गीकरण

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | स्वतंत्र जादा तास घेतो | १४ | ९३.३३ |
| २ | त्यांची कौटुंबिक माहिती मिळवितो | १० | ६६.६६ |
| ३ | त्यांच्यापुढे निश्चित ध्येय ठेवतो . | ११ | ७३.३३ |
| ४ | इतर- १. त्याची वेगळी चाचणी घेतो. | १ | ६.६६ |
| ५ | अनुत्तरित | १ | ६.६६ |
| | एकूण | ३७ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की १४(९३.३३ टक्के) असे प्रतिसादक प्राचार्यांनी स्वतंत्र जादा तास घेतो असे उत्तर दिले. दहा (६६.६६ टक्के) प्रतिसादकांनी त्याची कौटुंबिक माहिती मिळवतो असे सांगितले.अकरा (७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी त्याच्यापुढे निश्चित ध्येय ठेवतो असे सांगितले. एका(६.६६

टक्के) प्रतिसादकाने त्याची वेगळी चाचणी घेतो असे सांगितले तर एका (६.६६ टक्के) प्रतिसादकाने उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की स्वतंत्र जादा तास घेतो असे उत्तर देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या सर्वाधिक १४(९३.३३ टक्के) होती.

संशोधकाने यासंदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून असे समजले की, प्राध्यापकांना मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तयारी करुन घेतली जाते ही अत्यंत समाधानकारक बाब होती.

प्रश्न क्र. ४५ हा विद्यार्थ्यांची हजेरी समाधानकारक आहे का असा होता प्रतिसादकांकडून मिळालेली माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

बारा (८० टक्के) प्रतिसादक प्राचार्यांनी होय असे उत्तर दिले. तीन (२० टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून आले की जास्तीत जास्त कनिष्ठ महाविद्यालयातील हजेरी समाधानकारक होती. विद्यार्थ्यांची हजेरी समाधानकारक असणे अत्यंत आवश्यक असते. कारण प्रत्येक क्षण ही ज्ञान देणारा असतो. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांने नियमित उपस्थित असणे आवश्यक आहे असे संशोधकाला वाटते.त्यादृष्टीने बार्शी तालुक्यातील बहुसंख्य कनिष्ठ महाविद्यालयातील उपस्थिती समाधानकारक होती. ज्या ठिकाणी हजेरी समाधानकारक नव्हती तेथे विविध उपायांद्वारे हजेरी वाढवावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ४६ हा नसल्यास गैरहजेरी कमी करण्यासाठी कोणते उपाय करता? असा होता. प्रतिसादकाकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.२५

गैरहजेरी कमी करण्यासाठी केलेल्या उपायांचे वर्गीकरण

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पालकांना पत्र पाठविले जाते. | ६ | ४०.०० |
| २ | पालकांना बोलावून सूचना दिली जाते. | २ | १३.३३ |
| ३ | प्राध्यापक पालक केळावा घेऊन चर्चा करतो | ३ | २०.०० |
| ४ | दरमहा पालकांना अहवाल दिले जातात. | २ | १३.३३ |
| ५ | काही प्रमाणात शारीरिक व आर्थिक दंड केला जातो. | २ | १३.३३ |
| ६ | अनुत्तरित | ३ | २०.०० |
| | एकूण | १८ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की ६(४० टक्के) प्रतिसादकांनी पालकांना पत्र पाठविले जातेअसे उत्तर दिले. तीन (२० टक्के) प्रतिसादकांनी प्राध्यापक पालक मेळावा घेऊन चर्चा केली जाते असे सांगितले. प्रत्येकी २( १३.३३ टक्के) प्रतिसादकांनी पालकांना बोलावून सूचना दिली जाते, दरमहा पालकांना अहवाल दिले जातात काही प्रमाणात शारीरिक व आर्थिक दंड दिला जातो अशी उत्तरे दिली तर तीन (२० टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की गैरहजेरीचे प्रमाण कमी करण्यासाठी एकूण १५ पैकी १२(८० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विविध प्रयत्न केले जातात. परंतू ३(२० टक्के) प्राचार्य कोणतेही प्रयत्न करीत नाहीत त्यांनाही प्रयत्न करणे आवश्यक आहे.

एकंदरीत गैरहजर विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी विविध प्रयत्न केले जातात ही बाब समाधानकारक आहे.

छ) <u>कर्मचाऱ्यांच्या नियोजन व प्रशासनाविषयी माहिती.</u> :-

शैक्षणिक प्रशासन व नियोजनामध्ये कर्मचारी वर्गातील महत्वपूर्ण घटक असल्याने या संदर्भात माहिती मिळविणे आवश्यक असल्याने प्रश्न क्र. ४७ व ४८ हे प्रश्न कर्मचाऱ्यांच्या प्रशासन व नियोजन विषयक विचारण्यात आले होते.

प्रश्न क्र. ४७ हा शासकीय नियमानुसार लिपिक व सेवक संख्या व सेवक संख्या पुरेशी आहे का असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिले आहे.

कोष्टक क्र. ५.२६

लिपिक व सेवक संख्याविषयक माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | | | प्रतिसाद शेकडा प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरेशी आहे | शेकडा प्रमाण | पुरेसे नाही | शेकडा प्रमाण | अनुत्तरित | शेकडा प्रमाण |
| १ | लिपिक | १२ | ८०.०० | ३ | २०.०० | ००.०० | ००.०० |
| २ | प्रयोगशाळा सहायक | ४ | २६.०० | - | - | ११ | ७३.३३ |
| ३ | सेवक | १२ | ८०.०० | २ | १३.३३ | १ | ६.६६ |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की १२(८० टक्के) प्राचार्यांनी लिपिक संख्या पुरेशी आहे असे उत्तर दिले. तीन (२० टक्के) प्रतिसादकांनी नाही असे सांगितले. चार (२६.६६ टक्के) प्रतिसादकांनी प्रयोगशाळा सहायक पुरेसे आहेत असे उत्तर दिले. ११(७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिल नाही. बारा (८० टक्के) प्रतिसादकांनी सेवक संख्या पुरेशी नाही असे उत्तर दिले. एका (६.६६ टक्के) प्रतिसादकाने कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन विज्ञान शाखा चारच कनिष्ठ महाविद्यालयात असल्याने त्यांच्या चार प्राचार्यांनी प्रयोगशाळा सहायक पुरेसे आहेत असे उत्तर दिले तसेच १० कनिष्ठ

महाविद्यालयात सेवक पुरेसे असल्याचे आढळून आले. तात्र ५ कनिष्ठ महाविद्यालयात लिपिक वा सेवक पुरेसे. नव्हते.

या संदर्भात अधिक माहिती संकलित करण्यासाठी प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी लिल्या तसेच प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्या असता असे आढळून आले की, कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र सेवक वर्गाची व्यवस्था नाही. माध्यमिकशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात माध्यमिकचया सेवक वर्गाला कार्य करावे लागते. वरिष्ठ महाविद्यालयात कर्मचाऱ्यावरच कनिष्ठ महाविद्यालयाचा कार्यभार सोपविला जातो असे आढळून आले.

कनिष्ठ महाविद्यालयाचा कार्यभार पाहण्यासाठी हा माध्यमिक किंवा वरिष्ठ महाविद्यालयाप्रमाणेच स्वतंत्र कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ४८ हा पुरेसा सेवक वर्ग नसल्यास कामकाजावर कोणता परिणाम होतो? असा होता.प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिले आहे.

कोष्टक क्र. ५.२७

कर्मचारी कमतरतेमुळे कामावर होणाऱ्या परिणामाचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक सं. | प्रतिसाद शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पत्र व्यवहारात अडचणी निर्माण होतात | ६ | ४०.०० |
| २ | प्राचार्यावर कामाचा अधिक भांर पडतो | ७ | ४६.६६ |
| ३ | नियोजनाप्रमाणे कार्यवाहित अडचणी येतात. | ७ | ४६.६६ |
| ४ | स्वच्छतेची हेळसांड होते | ५ | ३३.३३ |
| ५ | प्रयोगशाळेची व्यवस्था ठेवली जात नाही | ५ | ३३.३३ |
| | एकूण | ३० | |

(टीप - काही प्रतिसादकांनी एकापेक्षा अधिक पर्याय दिल्याने प्रतिसादकांची संख्या जास्त येते.)

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ६(४०.०० टक्के) प्रतिसादक प्राचार्यांनी कर्मचारी कमी असल्यास पत्रव्यवहारात अडचणी येतात असे सांगितले. प्रत्येकी ७(४६.६६ टक्के) प्राचार्यांनी त्यांच्यावर कामाचा अधिक भार पडतो, नियोजनाप्रमाणे कार्यवाहित अडचणी येतात असे सांगितले. तर प्रत्येकी ५(३३.३३ टक्के) प्रतिसादकांनी स्वच्छतेची हेळसांड होते, प्रयोगशाळेची व्यवस्था ठेवली जात नाही असे उत्तर दिले.

यावरुन प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना विविध समस्या कर्मचारी अपुरा असल्याने येतात. या समस्या सोडविण्यासाठी शासनाने तशी तरतूद करणे आवश्यक आहे असे संशोधकाला वाटते. प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमण्याची तरतूद करावी असे संशोधकाला वाटते.

ज) कनिष्ठ महाविद्यालयांच्या भौतिक सुविधांविषयी माहिती :-

शैक्षणिक प्रशासन व नियोजनात मानवी घटकांप्रमाणेच भौतिक घटकांचे अनन्यसाधारण महत्व असते. प्रस्तुत विभागामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील भौतिक सुविधा विषयी माहिती मिळविण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रश्न क्र. ४९ ते ६२ असे एकूण १४ प्रश्न विचारले होते.

प्रश्न क्र.४९ हा इमारत विद्यार्थी संख्येच्या आवश्यकतेनुसार आहे काय ? असा होता. प्रतिसादकाकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे केलेले आहे.

एकूण १५ प्रतिसादक प्रचार्यांपैकी १२(८० टक्के) प्रतिसादक प्रचार्यांनी इमारत पुरेशी आहे असे उत्तर दिले तर १(६.६६ टक्के) प्रतिसादकाने नाही असे उत्तर दिले. दोन ( १३.३३ टक्के ) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की जास्तीत जास्त १२(८० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयाला पुरेशी इमारत होती. तीन '(२० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयाला पुरेशी इमारत नव्हती. विद्यार्थी संख्येनुसार पुरेशी इमारत असावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ५० हा पुरेशी इमारत नसल्यास वर्ग व्यवस्था कशी करता? असा होता प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.२८

अपुऱ्या इमारतीमुळे वर्गव्यवस्था विषयक उपायांचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | माध्यमिकच्या खोल्या उपयोगात आणल्या जातात. | १ | ६.६६ |
| २ | सोयीप्रमाणे व्यवस्था करतो | १ | ६.६६ |
| ३ | इमारत पुरेशी असल्याने समस्यां नाहीत | १ | ६.६६ |
| ४ | अनुत्तरित | १२ | ८०.०० |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, प्रत्येकी एका (६.६६ टक्के) प्रतिसादकाने माध्यमिकच्या खोल्या उपयोगात आणल्या जातात, सोयीप्रमाणे व्यवस्था करतो.

इमारत पुरेशी असल्याने समस्या नाहीत अशी उत्तरे दिली. बारा(८० टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही. यावरुन त्यांना त्या समस्या नाहीत.

या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने प्रत्यक्ष भेटी देउन निरीक्षण केले असता असे दिसून आले की एका (६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयाची स्थिती अत्यंत दयनीय होती. दोन (१३.३३ टक्के) कनिष्ठ

महाविद्यालये मंदिराच्या आवारात भरत होती. माध्यमिक शाळांशी सल्लग्न कनिष्ठ महाविद्यालय सकाळच्या सत्रात भरविली जात होती. त्यामुळे इमारतीची समस्या जाणवत नसल्याचे आढळून आले. वरिष्ठ महाविद्यालयामध्ये इमारत पूरेशी असल्याचे दिसून आले. ही समाधानकारक बाब आहे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ५१ कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली आहे का असा होता. प्रतिसादकाकडून मिळालेल्या माहितीचे विष्लेशण खालीलप्रमाणे आठ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले. सात (४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की जास्तीत जास्त प्रतिसादकांनी ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली असल्याचे सांगितले. या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने प्रत्यक्ष भेटी देऊन निरीक्षण केले व मुलाखतीचा उपयोग केला. प्रत्यक्ष निरीक्षणातून असे आढळुन आहे की ४(२६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र ग्रंथालय खोली होती. तीन(२० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथालय हा प्रकारच आढळून आला नाही. ८(५३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथालयासाठी खोली होती परंतू ग्रंथसंख्या कमी होती.

यावरुन ४(२६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात स्वतंत्र ग्रंथालय खोली होती व ग्रंथ पुरेसे होते. त्यातील तीन वरीष्ठ महाविद्यालयाशी संलग्न होती.बाकीचे एक ग्रंथालय माध्यमिकशी संलग्न होते. बाकी माध्यमिकशी संलग्न असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथालय खोलीविषयी अत्यंत बिकट स्थिती होती. माध्यमिकची ग्रंथालये अत्यंत कमी ग्रंथ असणारी होती. एकंदरीत ग्रंथालयाच्या बाबतीत ११(७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयाची स्थिती समाधानकारक होती.

प्रश्न क्र. ५२ हा ग्रंथालय खोली स्वतंत्र नसल्यास ग्रंथालयाची व्यवस्था कशी केली जाते ? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.२९

ग्रंथालय नसल्यास केल्या जाणाऱ्या व्यवस्थेविषयी माहितीचे वर्गीकरण

| अ. क्र. | प्रतिसादकाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादकाचे शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शिक्षक खोलीमध्ये केली जाते. | ३ | २०.०० |
| २ | प्रयोगशाळेत काही कपाटे ठेवली जातात. | १ | ६.६० |
| ३ | महत्वाचे ग्रंथ प्राचार्य कक्षात ठेवले जातात | २ | १३.३३ |
| ४ | वर्गामध्ये व्यवस्था केली जाते. | १ | ६.६६ |
| ५ | अनुत्तरित | ८ | ५३.३३ |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की ३ (२०टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक खोलीमध्ये ग्रंथालयाची व्यवस्था केली जाते. एका (६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात प्रयोगशाळेत काही कपाटे ठेवली जातात. तर एका (६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात वर्गामध्येच व्यवस्था केली जाते दोन (१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी महत्तवाचे ग्रंथ ठेवले जातात असे उत्तर दिले. आठ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे म्हणता येईल की, एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी

७ (४६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथालयाची बिकट अवस्था होती. आठ (५३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ग्रंथालय असल्याचे आढळले. पण त्यातील ४ कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथालय अगदी दयनीय होते.

प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयात ग्रंथालयाची योग्य व्यवस्था केली जावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ५३ हा प्राध्यापकांसाठी स्वतंत्र कक्ष आहे काय ? असा होता. प्रतिसांदकांकडून मिळालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

तेरा (८६.६६ टक्के ) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले.दोन (१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की, जास्तीत जास्त १३(८६.८८ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापकांयाठी स्वतंत्र कक्ष होते. या संदर्भात संशोधकाने अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रत्यक्ष निरीक्षण केले असता असे दिसून आले की माध्यमिकशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयापैकी ४(२६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांना स्वतंत्र कक्ष होते. वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांना स्वतंत्र कक्ष नव्हते. परंतु वरिष्ठ महाविद्यालयामध्ये विभाग निहाय कक्ष होत. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रांध्यापक ही त्या कक्षात बसत होते. त्यामुळे बाकी माध्यमिक शाळांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालयासाठी माध्यमिक शाळांच्या शिक्षक खोलीचाच उपयोग केला जातो.

परंतू २ (१३.३३टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची बैठक व्यवस्था समाधानकारक नव्हती. त्यांना स्वतंत्र खोली असावी असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ५४ हा स्वतंत्र कक्ष नसल्यास कोणत्या समस्या येतात असा होता. प्रतिसादकांनी दिलेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.३०

प्राध्यापक कक्षासंबंधी समस्यांचे वर्गीकरण

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | स्वतंत्र कामकाज करणे अवघड जाते. | १ | ६.६६ |
| २ | एकाग्रता प्राप्त होत नाही. | १ | ६.६६ |
| ३ | प्रयोगशाळेत बसावे लागते. | १ | ६.६६ |
| ४ | स्वाध्याय तपासण्यास अडचण येते. | २ | १३.३३ |
| ५ | अनुत्तरित | १० | ६६.६६ |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की प्रत्येकी एका (६६.६६ टक्के) प्रतिसादकांनी स्वतंत्र कामकाज करणे अवघड जाते. एकाग्रता प्राप्त होत नाही, प्रयोगशाळेत बसावे लागते असे उत्तर दिले. स्वाध्यास तपासण्यास अडचण येते असे २(१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी सांगितले. दहा (६६.६६ टक्के) प्रतिसादकांनी कोणते ही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की जास्तीत जास्त १०(६६.६६ टक्के) प्रतिसादकांनी कोणत्याही समस्या येत नाहीत असेच उत्तर दिले. याचा अर्थ त्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक खोलीच्या समस्या नव्हत्या.

प्रश्न क्र. ५३ ला उत्तर देताना १३ कनिष्ठ महाविद्यालयात स्वतंत्र कक्ष आहे असे म्हटले होते पण प्रश्न क्र. ५४ च्या उत्तरात ५ कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांनी समस्या सांगितल्या आहेत. म्हणजे १० कनिष्ठ महाविद्यालयात प्राचार्यांनी समस्या सांगितल्या आहेत. म्हणजे १० कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकांची बैठक व्यवस्था चांगली होती. बाकीच्या ५ कनिष्ठ महाविद्यालयात ही

व्यवस्था योग्य नसल्याने प्राध्यापकांना स्वतंत्र कामकाज करता येत नव्हते. अभ्यासामध्ये एकाग्रता येत नव्हती, स्वाध्याय तपासण्यास अडचणी येत होत्या.

या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने निरीक्षण केले असता असे आढळले की, कनिष्ठ महाविद्यालय ज्या स्तराशी संलग्न आहे तेथेच समायोजन करावे लागत होते. स्वतंत्र व्यवस्थेची समस्या बहुतेक ठिकाणी आढळली.

प्रश्न क्र. ५५ हा विज्ञान प्रयोगशाळेत आवश्यक ते साहित्य व साधने आहेत काय? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेली माहिती अशी होती. एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयापैकी ४ (२६.६६ टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले. तीन (२०.टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले तर ८(५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

बार्शी तालुक्यातील ४(२६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान शाखा होत्या.त्यामुळे प्रयोगशाळेचा संबंध चारच कनिष्ठ महाविद्यालयाशी होता. अकरा (७३.३३ टक्के)कनिष्ठ महाविद्यालयांना प्रयोग शाळेची गरज नव्हती. कारण त्यांच्याकडे विज्ञान शाखा नव्हती.

या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने प्राध्यापकांना प्रयोगशाळेतील साहित्य व साधनांविषयी विचारले असता साधने उपलब्ध आहेत असे उत्तर मिळाले. ही बाब समाधानकारक वाटते.

प्रश्न क्र. ५६ हा नसल्यास प्रयोगांची व्यवस्था कशी केली जाते ? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेली माहिती अशी होती. अकरा (७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही. दोन (१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी वरिष्ठ महाविद्यालयाची मदत घेता असे सांगितले. एकंदरीत प्रयोगाच्या साहित्याबद्दल समस्या नाहीत प्रतिसादकांच्या उत्तरावरुन आढळते.

या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने प्राध्यापकांची मुलाखत घेतली असता संबधीत प्राध्यापकांनीही प्रयोग साहित्याबद्दल समस्या

नसल्याचे सांगितले. संशोधकाने प्रयोगशाळेचे निरीक्षण केले असता साहित्य पुरेसे असल्याचे आढळते. संशोधकाला ही बाब समाधानकारक वाटते.

प्रश्न क्र. ५७ हा क्रीडांगण स्वतःच्या मालकीचे आहे काय ? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेली माहिती अशी की, ११(७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले. तीन (२० टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिल. एका (६.६६ टक्के) प्रतिसादकाने कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन जास्तीत जास्त ११(७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये क्रिडांगण होते असे दिसते. बाकीच्या कनिष्ठ महाविद्यालयास भेट देऊन निरीक्षण केले असता असे आढळून आले की, ४(२६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयत खेळाबाबत निराशात्मक स्थिती होती. दोन(१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालय क्रीडा स्पर्धाच घेतल्या जात नव्हत्या, नऊ(६० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात मात्र क्रिडांगण होते व स्पर्धा घेतल्या जात होत्या असे दिसून आले. बाकीच्या ६ कनिष्ठ महाविद्यालयांना पुरेसे कीडांगण नाही व खेळाची सोय नाही.

खेळ हा आवश्यक घटक असून विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास घडवून आणण्यासाठी खेळांचे महत्व लक्षात घेतले पाहिजे. त्यासंदर्भात शासनानेही प्रयत्न करावेत असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ५८ हा क्रीडांगण नसल्यास खेळाची व्यवस्था कशी केली जात ? असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

## कोष्टक क्र. ५.३१

## खेळाच्या व्यवस्थेविषयी माहितीचे वर्गीकरण

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | खेळासाठी वेळच मिळत नाही | १ | ६.६६ |
| २ | सोयीप्रमाणे व्यवस्था करतो | १ | ६.६६ |
| ३ | उपलब्ध क्रीगडांगणावर ठराविक खेळ घेतो. | १ | ६.६६ |
| ४ | अनुत्तरित | १२ | ८०.०० |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकारुन असे दिसून येते की, प्रत्येकी १(६.६६ टक्के) प्रतिसादकाने खेळासाठी वेळच मिळत नाही, एकाने सोयीप्रमाणे व्यवस्था करतो. एकाने उपलब्ध क्रीडांगणावर ठराविक खेळ घेतो असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की, खेळाकडे फारसे लक्ष दिले जात नाही, तीन (२० टक्के) प्रतिसादकांनी नकारात्मक स्वरुपाची उत्तरे दिली.

संशोधकाने या संदर्भात अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयाला भेटी देऊन सद्यस्थिती पाहिली असता क्रिडांगणाचा अभाव असल्याने खेळाकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून आले.

प्रश्न क्र.५९ हा स्वच्छतागृहे पुरेशी आहेत काय असा होता. प्रतिसादकाकडून मिळालेली माहिती अशी की ९(६० टक्के प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले. चार (२६.६६ टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले. दोन (१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोठलेही उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की, स्वच्छतागृहे असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या सर्वसामान्यपणे नऊ ही अधिक होती.

या संदर्भात अधिक माहितीसाठी संशोधकाने प्रत्यक्ष निरीक्षण केले असता असे दिसून आले की पुरुषांकरीता स्वच्छतागृहे काही कनिष्ठ महाविद्यालयात प्रमाणात नाहीत. स्वच्छतागृहे पुरेशी व स्वतंत्र असणे आवश्यक बाब आहे. पण ६(४० टक्के) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ही सोय अत्यंत अपुरी होती.

प्रश्न क्र. ६० हा नसल्यास कोणत्या अडचणी येतात ? असा होतो. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण खालील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.३२

स्वच्छतागृहाअभावी येणाऱ्या अडचणींचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मुलींच्या बाबतीत अडचणी निर्माण होतात | ३ | २०.०० |
| २ | विद्यार्थी तक्रार करतात | २ | १३.३३ |
| ३ | आवश्यक बाब असल्याने गैरसोय होते | २ | १३.३३ |
| ४ | अनुत्तरित | ८ | ५३.३३ |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ३(२०.०० टक्के) प्रतिसादकांनी मुलींच्या बाबतीत अडचणी निर्माण होतातअसे उत्तर दिले, प्रत्येकी २ (१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी विद्यार्थी तक्रार करतात, आवश्यक बाब असल्याने गैरसोय होते असे उत्तर दिले. आठ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की, ७ (४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी विद्यार्थ्यांच्या समस्याविषयक उत्तरे दिली. प्रामुख्याने मुलींच्या संदर्भात समस्या येत असल्याचे

सांगितले. आठ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी मात्र कोणत्याही स्वरुपाचे उत्तर दिले नाही.

या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रत्यक्ष भेटून निरीक्षण केले असता जास्तीत जास्त कनिष्ठ महाविद्यालयात स्वच्छतागृहांची गैरसोय आढळली. संस्थाचालकांनी शासनाकडून मिळणारे अनुदान पुरेसे नसल्याचे सांगितले. तरी संस्थेचा बांधण्याचा मनोदय असल्याचे व्यक्त केले.

प्रश्न क्र. ६१ हा विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिले आहे.

कोष्टक क्र. ५.३३

विद्यार्थी आरोग्य विषयक प्रयत्नांचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रयत्नांचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येक महिन्यात वैद्यकीय तपासणी केली जाते. | ४ | २६.६६ |
| २ | वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी केली जाते. | ६ | ४०.०० |
| ३ | शारीरिक शिक्षण सक्तीचे असते. | १३ | ८६.६६ |
| ४ | आहारविषयक योग्य मार्गदर्शन केले जाते. | ८ | ५३.३३ |
| ५ | निरोगी जीवनासाठी आसने करवून घेतली जातात. | ७ | ४६.६६ |
| | एकूण | ३८ | |

(टीप. काही प्रतिसादकांनी एकापेक्षा अधिक पर्याय दिल्याने प्रतिसादकांची संख्या जास्त येते.)

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ४ (२६.६६ टक्के) प्रतिसादकांनी प्रत्येक महिन्याला वैद्यकीय तपासणी केली जात असे उत्तर दिले.सहा (४० टक्के) प्रतिसादकांनी वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी केली जाते असे उत्तर दिले. तेरा (८६.६६ टक्के) प्रतिसादकांनी शारीरिक शिक्षण सक्तीचे असते असे उत्तर दिले. आठ (५३.३३ टक्के) प्रतिसादकांनी आहारविषयक योग्य मार्गदर्शन केले जाते असे उत्तर दिले. सात (४६.६६ टक्के) प्रतिसादकांनी निरोगी जीवनासाठी आसने करवून घेतली जातात असे सांगितले.

यावरुन असे दिसून येते की, बहुतांश प्रतिसादकांनी शारीरिक शिक्षण सक्तीचे असते असे उत्तर दिले. त्याचबरोबर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात आरोग्यविषयक विविध प्रयत्न केले जातात असे सांगितले.

या संदर्भात अधिक माहितीसाठी संशोधकाने प्रत्यक्ष निरीक्षण केले तसेच संस्थाप्रमुख, प्राध्यापक यांच्याशी या संदर्भात चर्चा केली असता त्यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयी विविध प्रयत्न केले जातात असे सांगितले.

चार प्राचार्यांनी प्रत्येक महिन्याला वैद्यकीय तपासणी केली जाते असे सांगितले ते सत्य वाटत नाही. कारण कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करणारी महाविद्यालये कमी आहेत. शारीरिक शिक्षण सक्तीचे असते असे १३ (८६.६६ टक्के) प्राचार्यांनी म्हटले असले तरी प्रश्न क्र.५६, ५७ च्या माहितीवरुन ९ (६०टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात क्रीडांगण होते. सात प्राचार्यांनी आसने करुन घेतो असे सांगीतले तरीही एकून आरोग्याकडे कमी लक्ष असल्याचे दिसून येते, ही अधिक समाधानकारक बाब नाही.

प्रश्न क्र.६२ हा पिण्याच्या पाण्याची सोय कशी केली आहे असा होता. प्रतिसादकाकडून मिळालेली माहिती पुढील कोष्टकात दिलेली आहे.

## कोष्टक क्र. ५.३४

## पिण्याच्या पाण्याविषयी माहितीचे वर्गीकरण

| अ.क्र | प्रदिसादाचे स्वरुप | प्रतिसादक सख्या | प्रतिसाद शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी दोन स्वतंत्र पाण्याच्य टाक्या आहेत. | २ | १३.३३ |
| २ | विद्यार्थी व स्टाफला स्वतंत्र सोय आहे. | १ | ६.६६ |
| ३ | हौद आहे. | ३ | २०.०० |
| ४ | प्रशालेच्या आवारात पाण्याचा पंप व हौद आहेत. | २ | १३.३३ |
| ५ | समाधानकारक सोय आहे. | २ | १३.३३ |
| ६ | पाण्याची टाकी आहे. | ८ | ५३.३३ |
| ७ | अनुत्तरित | १ | ६.६६ |
| | एकूण | १८ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ८ (५३.३३टक्के) प्रतिसादकांनी पाण्याची टाकी आहे असे सांगीतले. तीन (२० टक्के) प्रतिसादकांनी हौद आहे असे सांगीतले. प्रत्येकी २ (१३.३३ टकके) प्रतिसादकांनी विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी दोन स्वतंत्र टाक्या आहेत,प्रशालेच्या आवारात पाण्याचा पंप व हौद आहे असे सांगीतले प्रत्येकी एका (६.६६टक्के) प्रतिसादकांनी विद्याथी व स्टाफला स्वतंत्र सोय आहे बसे उत्तर दिले. एका(६.६६टक्के) प्रतिसादकाने मात्र कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की, बहुतांश प्राचार्यांनी पाण्याची वेगवेळया पद्धतीने सोय केल्याचे दिसून आले. प्रत्यक्ष निरीक्षणातूनही पाण्याच्या टाकीद्वारे सोय केली असल्याचे आढळले.

(झ) आर्थिक बाबी विषयी माहिती :-

कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजन व प्रशासनाचा अभ्यास करताना विविध सुविधाकरिता येणाऱ्या खर्चाचे नियोजन करावे लागते. प्रशासकीय कामकाजामध्ये योग्य त्या ठिकाणी आवश्यक तेवढा खर्च करावा लागतो. शासनाकडून मिळणारे अनुदान व त्याचा विनियोग तसेच संस्थेचे आर्थिक व्यवहार अशी विविध आर्थिकबाबी विषयी माहिती मिळवणे गरजेचे असल्याने संशोधकाने प्रस्तुत विभागात प्रश्न क्र. ६३ ते ६७ असे पाच प्रश्न विचारले होते.

प्रश्न क्र. ६३ हा शासनाकडून मिळणारे अनुदान पुरेसे आहे काय असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेली माहिती अशी की, एका (६.६६ टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले . तेरा (८६.६६ टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले. तर एका (६.६६ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की जास्तीत जास्त तेरा (८६.६६ टक्के) प्रतिसादकांनी शासनाकडून मिळणारे अनुदान अपुरे असल्याने सांगितले. या संदर्भात संशोधकाने संस्था चालकाशी चर्चा करुन त्यांनीही अनुदान कमी पडत असल्याचे सांगितले.

एकंदरीत शासनाकडून मिळणारे अनुदान विविध उपक्रमाकरिता कमी पडत असल्याचे दिसून आले.

प्रश्न क्र. ६४ हा अनुदान पुरत नसल्यास कोणती पर्यायी व्यवस्था करता? असा होता. प्रतिसादकाकडून मिळालेलया माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.३५

अपुऱ्या अनुदानामुळे केलेल्या पर्यायी व्यवस्थेचे वर्गीकरण

| अ.क्र. | पर्यायी व्यवस्थेचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | संस्थेकडून मदत घेतली जाते. | ३ | २०.०० |
| २ | देणगी स्वरुपात अनुदान गोळा करतो. | १ | ६.६६ |
| ३ | काटकसरीने भागवितो. | ३ | २०.०० |
| ४ | ग्रामस्थांची मदत घेतो. | १ | ६.६६ |
| ५ | वरिष्ठ विभागाकडून काही बाबी भागवितो. | २ | १३.३३ |
| ६ | अनुत्तरित | ५ | ३३.३३ |
| | एकूण | १५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, प्रत्येकी ३ (२० टक्के) प्रतिसादकांनी संस्थेकडून मदत घेतली जाते, काटकसरीने भागवितो असे उत्तर दिले. प्रत्येकी १(६.६६ टक्के) प्रतिसादकांनी देणगी स्वरुपात अनुदान गोळा करतो, ग्रामस्थांची मदत घेतली जाते असे उत्तर दिले. दोन (१३.३३ टक्के) प्रतिसादकांनी वरिष्ठ महाविद्यालयाच्या विभागाकडून काहर बाबी भागवितो असे सांगितले. पाच (३३.३३ टक्के) प्रतिसादकांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की अनुदान अपुरे पडत असल्याने कोणती ना कोणती पर्यायी व्यवस्था करुन कामकाज चालविले जाते. परुतू ज्या प्रतिसादकांनी

कोणतेही उत्तर दिले नाही त्यांच्या कडेही काही पर्यायी व्यवस्था असेल असे प्रतिसादकाला वाटते.

एकूण असे दिसून येते की मिळणारे अनुदालन हे जेमतेम खर्च भागविण्यापुरतेच कनिष्ठ महाविद्यालयांना मिळते. आरक्त विकास निधी मिळत नाही जी संस्थेकडून देणगी रुपाने गोळा करावा लागतो. असे दिसते. पण अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांची स्थिती आर्थिक दृष्टया ठीक असल्याचे दिसून येते. फक्त विना अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांना स्थिती बिकट असते.

प्रश्न क्र. ६५ हा अपुऱ्या अनुदानाचे कोणते परिणाम होतात असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र.५.३६

अपुऱ्या अनुदानामुळे होणाऱ्या परिणामाचे वर्गीकरण

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | विविध उपक्रम राबविता येत नाहीत. | १३ | ८६.६६ |
| २ | शैक्षणिक साधन सामुग्री आवश्यक प्रमाणात खरेदी करता येत नाही. | १४ | १३.३३ |
| ३ | विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा पुरविणे अशक्य होते. | १२ | ८०.०० |
| ४ | शाळेचा सर्वांगीण विकास होत नाही. | १ | ६.६६ |
| ५ | अनुत्तरित | १ | ६.६६ |
| | एकूण | ४१ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की १३(८६.६६ टक्के) प्रतिसादेंनी विविध उपक्रम राबविता येत नाहीत असे उत्तर दिले. चौदा (९३.३३ टक्के) प्रतिसादकांनी शैक्षणिक साधन सामुग्री आवश्यक प्रमाणात खरेदी  खरेदी करता येत

नाही असे उत्तर दिले. बारा (८०.०० टक्के) प्रतिसादकांनी विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा पुरविणे अशक्य होते असे उत्तर दिले. एका (६.६६ टक्के) प्रतिसादकाने शाळेचा सर्वांगीण विकास होत नाही असे सांगितले. एका (६.६६ टक्के) प्रतिसादकाने कोणतेही उत्तर दिलेले नाही.

यावरुन असे दिसून येते की, अनुदान अपुरे असल्यामुळे शाळेच्या उपक्रमासंदर्भात व शैक्षणिक साधनांच्या बाबतीत प्रामुख्याने अडचणी येतात त्या त्या शाळेच्या सर्वांगीण विकासावर परिणाम. होतो. असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ६६ हा शासकीय शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळवून देता काय असा होता. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, एकूण १५ प्रतिसादकांपैकी १४(९३.३३ टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले.
एका (६.६६ टक्के) प्रतिसादकाने मात्र स्पष्ट नाही असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की, जास्तीत जास्त १४(९३.३३ टक्के) प्राचार्य विद्यार्थ्यांकरिता प्रयत्न करत असल्याचे आढळून आहे. ही बाब समाधानकारक आहे असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र. ६७ हा हिशेब तपासणी संस्थेकडून केली जाते काय असा होता. या संदर्भात एकूण १५ प्रतिसादकांपैकी १४(९३.३३ टक्के) प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले, १(६.६६ टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले.

यावरुन बहुतांश ठिकाणी संस्थेकडून हिशेब तपासत असल्याचे दिसून येते. आर्थिक व्यवहारात गडबड होऊ नये म्हणून संस्थेचे नियंत्रण असणे योग्य आहे असे संशोधकाला वाटते.

ट) परीक्षाविषयी नियोजन व प्रशासनसची माहिती :-

शिक्षण प्रक्रियेमध्ये मुल्यमापनास महत्वाचे स्थन असते .शैक्षणीक विकास योग्य दिशेने व योग्ये गतीने होण्याकरीता नियोजनाची आवश्यकता असते त्याची अंमलबजावनी उचीत प्रकारे करण्यासाठी सूचक प्रशासनाची गरज असते एकंदरीत परीक्षा विषयक विविध बाबींची वेळेवर पूर्तता होण्यासाठी कार्याचे विभाजन करुन

सूसूत्रता साधणे आवश्यक असते. त्या संदर्भात माहिती मिळविण्यासाठी या घटकांमध्ये संशोधकाने प्रश्न क्रं.६८ ते ७० असे तीन प्रश्न विचारले होते.

प्रश्न क्रं. ६८ हा आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात एच.एस.सी. परीक्षेचे आयोजन केले जाते काय असा होता, त्या संदर्भात मिळालेली माहिती अशी होती, एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयापैकी १३(८६.६६ टक्के) प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले. दोन (१३.३३ टक्के) प्रतिसादकोनी होय असे उत्तर दिले.

यावरुन असे दिसून येते की बहुतांश लोक कनिष्ठ महाविद्यालयात एच.एस. सी. परीक्षेचे आयोजन केले जात नाही. दोन (१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात मात्र एच.एच.सी. परीक्षेचे आयोजन करण्यासाठी इमारत पुरेशी असावी लागते. तसेच पर्यवेक्षण व इतर बाबींची पूर्तता होणे तसेच कडक शिस्त राखणे या गोष्टी आवश्यक असतात असे संशोधकाला वाटते. प्रश्न क्र. ६९ हा असल्यास कोणते फायदे व तोटे होतात ? असा होतो. प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

### कोष्टक क्र. ५.३७

### एच.एच.सी. परीक्षेच्या आयोजनाबाबत होणाऱ्या फायदे व तोटे विषयक माहितीचे वर्गीकरण

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप फायदे | प्रति. संख्या | प्रतिसादक शेकडा प्रमाण | अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप तोटे | प्रति संख्या | प्रति शे. प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांना अन्यत्र जावे लागत नाही | १ | ६.६६ | १ | नियंत्रणाच्या समस्या निर्माण होते | १ | ६.६६ |
| २ | प्राध्यापकांना पर्यवकक्षकाचा अनुभव मिळतो | २ | १३.३३ | २ | पर्यवेक्षकाच्या अडचणी येतात | १ | ६.६६ |
| ३ | प्राध्यापक व अन्य कर्मचाऱ्यांना मानधन मिळते. | १ | ६.६६ | ३ | विद्यार्थ्यामध्ये शिस्त राखणे अवघड होते. | १ | ६.६६ |
| ४ | विद्यार्थ्यांची सोय होते | १ | ६.६६ | ४ | कनिष्ठ महाविद्यालयाच्या अन्य कार्यात व्यत्यय येतो. | १ | ६.६६ |
| ५ | अनुत्तरित | १० | ६.६६ | ५ | अनुत्तरित | ११ | ७३.३३ |
| | एकूण | १५ | | | एकूण | १५ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, एच.एच.सी. परीक्षेच्या आयोजना संदर्भात होणारे फायदे सांगणाऱ्या प्रत्येकी एका (६.६६ टक्के) प्राचार्यांची विद्यार्थ्यांना अन्यत्र जावे लागत नाही, प्राध्यापक व अन्य कर्मचाऱ्यांना मानधन मिळते, विद्यार्थ्यांची सोय होते असे उत्तर दिले. दोन (१३.३३ टक्के) प्राचार्यांनी प्राध्यापकांना पर्यवेक्षण कामाचा अनुभव मिळतो असे सांगितले. दहा(६६.६६ टक्के) प्राचार्यांनी कोणतेही फायदे होत नसल्याचे सांगितले. तोटे विषयक प्रतिसाद देताना प्रत्येकी एका (६.६६ टक्के) प्राचार्यांनी नियंत्रणची समस्या निर्माण होते. पर्यवेक्षकांच्या अडचणी निर्माण येतात, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखणे अवघड होते व कनिष्ठ महाविद्यालयाच्या अन्य कामात व्यत्यय होतो असे उत्तर दिले. अकरा (७३.३३ टक्के) प्राचार्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

यावरुन असे दिसून येते की ,एकंदरित एच.एच.सी. परीक्षेच्या आयोजनामुळे काही फायदे व काही तोटे होत असल्याचे दिसून आले असले तरी दोन्ही बाबतीत उदासिनता दाखविल्याचे प्रमाण अधिक होते.

प्रश्न क्र. ७० हा एच.एच.सी. च्या विद्यार्थ्यांची परीक्षेची तयारी कशी करुन घेता ? असा होता प्रतिसादकांकडून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.३८

एच.एच.सी. च्या विद्यार्थ्यांची परीक्षेची तयारी विषयीचे वर्गीकरण

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रति.सं. | प्रति.शे. प्र. |
|---|---|---|---|
| १ | दरमहा चाचणी घेऊन त्रुटी दुरुस्त करणे. | १० | ६६.६६ |
| २ | अगोदरच्या वार्षिक प्रश्नपत्रिका सोडवून घेतो. | १५ | १००.०० |
| ३ | प्रश्नपत्रिकेतील गुणविभागानुसार तयारी करुन घेतो. | ११ | ७३.३३ |
| ४ | इंग्रजीचे वर्षभर ज्यादा तयारीसाठी वर्ग असतात. | १ | ६.६६ |
| | एकूण | ३७ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून आले की, १०(६६.६६ टक्के) प्रतिसादकांनी दरमहा चाचणी घेऊन त्रुटी दुरुस्त क़रुन घेतात असे सांगितले. पंधरा (१०० टक्के) प्रतिसादकांनी अगोदरच्या वार्षिक प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या जातात असे सांगितले. अकरा (७३.३३ टक्के) प्रतिसादकांनी प्रश्नपत्रिकेतील गुणविभागणी नुसार तयारी करुन घेतली जाते असे उत्तर दिले. एका (६.६६ टक्के) प्रतिसादकांने इंग्रजीचे वर्षभर जादा तयारीसाठी वर्ग असतात असे उत्तर दिले.

यावरुन असे निदर्शनास येते की जास्तीत जास्त प्रमाणात एच.एस.सी.ची तयारी करुन घेतली जाते. विशेषतः प्रश्नपत्रिका सोडवून घेण्याचे प्रमाण तर १०० टक्के आढळले ही बाब समाधानकारक आहे. प्रत्यक्ष निरीक्षण व मुलाखती मधूनही प्राध्यापक व विद्यार्थी दोन्ही प्रयत्न करत असल्याचे दिसून आले. इंग्रजीचे जादा तास घेएयाचे प्रमाणही उत्तम होते. एकंदर या बाबतीत विशेष उत्साही वातावरण आढळून आले.

ठ) संशोधनाबददल इतर माहिती :-

कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजन व प्रशासन सुधारण्या करिता विविध उपाय योजना सुचविण्यासाठी प्राचार्याकडून या संदर्भात इतर माहिती गोळा करण्याचा प्रयत्न या घटकात कला होता. यामध्ये प्रश्न क्र. ७१ व ७२ असे दोन प्रश्न विचारले होते.

प्रश्न क्र. ७१ हा कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन सुधारण्यासाठी आपण उपाय सुचवाल ? असा होता. प्रतिसादकांनी दिलेल्या माहितीचे वर्गीकरण पुढील कोष्टकात दिलेले आहे.

कोष्टक क्र. ५.३९

कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक नियोजन व प्रशासन सुधारण्यासाठी प्रयत्नांचे वर्गीकरण

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रति. शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ महाविद्यालयातील विभाग स्वतंत्र असावा. | ४ | २६.६० |
| २ | पुरेसे अनुदान व स्वतंत्र सेवक वर्ग असावा. | २ | १३.३३ |
| ३ | स्वतंत्र प्रशासन असावे. | ३ | २०.०० |
| ४ | ग्रामीण भागासाठी विद्यार्थी संख्या मर्यादित हवी. | २ | १३.३३ |
| ५ | विद्यार्थ्यांची प्रत्येक तासाला हजेरी घ्यावी. | १ | ६.६६ |
| ६ | स्वतंत्र व्यवस्थापन असावे. | २ | १३.३३ |
| ७ | शासनाने प्राचार्यांना स्वायत्तता द्यावी. | १ | ६.६६ |
| ८ | अनुत्तरित | ३ | २०.०० |
| | एकूण | १८ | |

वरील कोष्टकारुन असे दिसून येते की ४(२६.६६ टक्के) प्रतिसादकांनी कनिष्ठ महाविद्यालयातील विभाग स्वतंत्र असावा असे उत्तर दिले. तर २ प्राचार्यांनी स्वतंत्र व्यवस्थापन असावे असे म्हटले आहे. तीन प्राचार्यांनी स्वतंत्र प्रशासन असावे असे म्हटले आहे. एकूण ९(६० टक्के) प्राचार्यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचे स्वतंत्र व्यवस्थापन व प्रशासन असावे असे म्हटले आहे.

प्राध्यापकांच्या मुलाखतीमध्येही अनेक प्राध्यापकांनी कनिष्ठ महाविद्यालये स्वतंत्र असावी त्यांना स्वतंत्र अनुदान, स्वतंत्र सेवक वर्ग असावा असे मत व्यक्त केले. संशोधकाला ही वाटते की, कनिष्ठ महाविद्यालयाचे व्यवस्थापन व प्रशासन स्वतंत्र असावे. त्यांना अनुदान व सेवक वर्ग द्यावा.

इतर उपायांमध्ये ग्रामीण भागासाठी विद्यार्थी संख्या कमी असावी असा उपाय २ प्राचार्यांनी सांगितला . पण आज आहे तो विद्यार्थी मर्यादा संशोधकाला योग्य वाटते. प्रत्येक तासाला हजेरी घ्यावी प्राचार्यांना स्वायत्तता द्यावी या सूचना चांगल्या आहेत.

प्रश्न क्र. ७२ हा याशिवाय या संशोधनाबददल माहिती द्यावयाची असल्यास खाली द्यावी ?असा होता. या संदर्भात मिळालेला प्रतिसाद खालील प्रमाणे आहे.

१. विद्यार्थी संख्या सर्वत्र सारखी असावी, सर्व ठिकाणी एका वर्गात ६० विद्यार्थी संख्या असावी.(२)

२. स्वतंत्र प्राचार्य व कार्यालयीन कर्मचारी असावेत.(१)

३. अनुदानाची पध्दत बदलावी, अनुदानाची स्वतंत्र संहिता असावी.(१)

४. कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या शैक्षणिक पात्रता, पगार, सेवाशर्तीबाबत स्वतंत्र नियमावली असावी.(१)

५. कोठारी आयोगानुसार +२ स्तर अधिक व्यवसायभिमुख करण्यात यावा.(१)

६. माध्यमिकशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांच्या तासिकांचा अवधी वाढविणे आवश्यक आहे.(४)

७. शारीरिक शिक्षण सक्तीचे करावे.(१)

८. शासनाने या स्तराकडे विशेष लक्ष द्यावे.(१)

९. अनुत्तरित. (४)

वरील उपाय चांगले सुचविले आहेत. त्यातील प्रमुख खालील प्रमाणे आहेत.

१. स्वतंत्र प्राचार्य, स्वतंत्र सेवक वर्ग, स्वतंत्र प्रशासन व स्वतंत्र सेवाशर्ती, अनुदानसंहिता असावी.

२. माध्यमिक शाळांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयासाठी वेगळ वेळापत्रक ठेवावे, तासिका जास्त कालावधीच्या ठेवाव्या.

३. विद्यार्थी संख्या ६० ठेवावी.

४. +२ स्तर अधिक व्यवसायभिमुख करावा. हया सूचना खूप चांगल्या आहेत.

५.३ मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

संशोधकाने प्राध्यापक, संस्था चालक व शासकीय अधिकारी यांच्या मुलाखती घेतल्या.

प्राचार्यांच्या प्रश्नावलीत व प्राध्यापक, संस्थाचालक, शासकीय अधिकारी यांच्या मुलाखत सूची मध्ये जे घटक समान होते त्याचे विश्लेषण व अर्थनिवर्चन यापूर्वी केलेले आहेच. परंतू प्राध्यापक शासकीय अधिकारी व संस्थाचालक यांना जे कांही इतर प्रश्न विचारले होते अशा प्रश्नांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

क) प्राध्यापकांच्या मुलाखतीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

संशोधकाने मुलाखतीसाठी एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयातील तीनही शाखातील एकूण २६ प्राध्यापकांची निवड केली. त्यांची नावे परिशिष्ट क्र. ४ मध्ये देण्यात आली आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीवरुन हे स्पष्ट होते की १०० टक्के प्राध्यापक हे किमान द्वितीय श्रेणीतील पद्व्युत्तर शिक्षण घेतलेले असून ते प्रशिक्षित होते. एकंदरित योग्य त्या शैक्षणिक अर्हतेचे प्राध्यापक असल्याचे आढळले. ते शिकवित असलेल्या विषयातील त्यांची शैक्षणिक अर्हता योग्य होती.

संशोधकाने शैक्षणिक अर्हतेबाबत विचारलेल्या माहितीचे पुढील काष्टकात वर्गीकरण केले आहे.

कोष्टक क्र. ५.४०

कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकाच्या शैक्षणिक अर्हतानुसार वर्गीकरण -

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हतेचे स्वरुप | प्राध्यापक संख्या | प्राध्यापक शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एम.ए.बी.एड. | १७ | ६५.३८ |
| २ | एम.एस्सी. बी.एड. | ८ | ३०.७६ |
| ३ | एम.कॉम. बी.एड. | १ | ३.८४ |
| | एकूण | २६ | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्रतिसादक प्राध्यापक प्रशिक्षित होते. एम.ए.बी.एड. पदवी धारक प्राध्यापकांची संख्या १७(६५.३८ टक्के) होती, एम.एस्सी.बी.एड. पदवीधारक प्राध्यापकांची संख्या ८(३०.२६ टक्के) होती, एम.कॉम.बी.एड. पदवीधारक प्राध्यापकांची संख्या १(३.८४ टक्के) होती.

यावरुन असे दिसून येते की एम.ए.बी.एड. प्राध्यापकांची संख्या अधिक होती. बार्शी तालुक्यातील एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कला शाखा होती. त्यामुळे एम.ए.बी.एड. प्राध्यापकांची संख्या अधिक प्रमाणात आढळून आली. त्या प्रमाणात संशोधकाने मुलाखतीसाठी निवड केलेली होती. विज्ञान व वाणिज्य शाखा ज्या प्रमाणात होत्या त्याच प्रमाणात प्राध्यापकांची निवड करण्यात आली.

प्राध्यापकांना मुलाखतीमध्ये सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबत प्रश्न विचारला होता. त्या संदर्भात जवळजवळ सर्वच प्राध्यापकांनी असे स्पष्ट केले की, कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना संबंधित विषयातील प्रशिक्षणाची गरज आहे. हे प्रशिक्षण विषय संघटना मार्फत किंवा शिक्षण खात्यामार्फत उपलब्ध करुन दिले जावे. असे संशोधकाला वाटते.

कनिष्ठ महाविद्यालयात विविध विषयासंदर्भात नियतकालिके, वर्तमानपत्रे मागविली जातात का हे पाहण्यासाठी प्रश्न विचारला होता, तेंव्हा बहुतेकांनी नियतकालिके पुरेशा प्रमाणात येत नसल्याचे सांगितले. शिक्षण क्षेत्राशी संबंधित तसेच विविध विषयांच्या अभ्यासक्रमानुरु प विविध नियतकालिके कनिष्ठ महाविद्यालयात मागविल्याने प्राध्यापक व विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल असे संशोधकाला वाटते.

### ख) संस्था चालकांच्या मुलाखतीच्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

संस्था प्रतिनिधींच्या मुलाखतीसाठी जी प्रश्नसूची तयार केली होती. त्यातील प्रश्न क्र. ७ ते ९ मधून मिळालेली माहिती प्राचार्यांच्या प्रश्नावलीतून मिळालेल्या माहितीशी समान व सुसंगत असल्याने प्रश्नावलीच्या विश्लेषण व

अर्थनिर्वाचनामध्ये ती समाविष्ठ केलेली आहे. उरलेल्या प्रश्नाद्वारे मिळालेली माहितीपेक्षा थोडी वेगळी असल्याने पुढीलप्रमाणे दिली आहे.

ख-१. सर्वसामान्य प्रश्न :-

प्रश्न क्र. १ हा कनिष्ठ महाविद्यालयाच्या दैनंदिन कामात आपण कोणत्या प्रकारे लक्ष घालता असा प्रश्न विचारला होता बहुसंख्य सात(८७.५ टक्के) संस्था चालकांनी अधूनमधून कनिष्ठ महाविद्यालयाला भेट देतो. प्राचार्य व प्राध्यापकाशी चर्चा करतो, दैनंदिन कामात हस्तक्षेप करत नाही असे सांगितले. काही संस्था चालकांनी प्राध्यापक, पालक व विद्यार्थी यांच्या अडचणी शंका, तक्रारी एकूण त्यावर पर्याय सूचविण्याचा प्रयत्न करतो. असे सांगितले तर काही संस्था चालकांनी दैनंदिन जास्तीत जास्त कामात लक्ष घालतो, प्राध्यापकांच्या कामावर लक्ष ठेवतो. यावरुन असे दिसून येते की, बऱ्याच संस्था चालकांचे कनिष्ठ महाविद्यालयाच्या दैनंदिन कामकाजावर लक्ष प्रशासन व नियोजनाच्या दृष्टीने चांगली बाब होती.

प्राध्यापकांच्या कामकाजावर लक्ष देणे हे प्राचार्यांचे काम असल्याने संस्था चालकाने यात अनावश्यक लक्ष घालू नये. संस्था चालकांचे अधिकार म्हणजे दुहेरी शस्त्र असल्याने त्यानी ते जपूनच वापरावे.

प्रश्न क.२ हा प्राचार्यांचे आपणाला कोणते सहकार्य मिळते असा विचारला होता. तीन (३७.५ टक्के) संस्था चालकांनी प्राचार्य दैनंदिन अडीअडीचणी आपल्या कानावर घालतात असे सांगितले. निकाल उंचावण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करतात. कनिष्ठ महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी आपले प्राचार्य प्रयत्नशील असतात. जास्तीत जास्त संपर्क ठेवतात. मासिक सभांचा अहवाल नियमितपणे देतात असे सांगितले.

यावरुन जवळजवळ सर्वच कनिष्ठ महाविद्यालयांचे संस्थाचालक व प्राचार्य यांचे चांगले संबंध असून सर्वच प्राचार्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी झटत असल्याचे समजते. ही बाब प्रशासन ब नियोजनाच्या दृष्टीने चांगली आहे.

ख-२ प्राध्यापकांच्या प्रशासनासंबंधी माहिती :-

प्रश्न क्र. ३ हा प्राध्यापकांना नियमित पगार दिला जातो का असा विचारला होता.

या प्रश्नाचे उत्तर देताना सर्वच संस्थाचालकांनी सर्व प्राध्यापकांना नियमितपणे पगार दिला जातो असे सांगितले.

परंतू संशोधकाने प्राध्यापकांशी केलेल्या खाजगी चर्चेतून विनाअनुदानीत कनिष्ठ महाविद्यालयामध्ये पगार कधीही नियमित होत नसल्याचे सांगितले. इतकेच नव्हे तर वर्षाचा पगार एकदाच कधीतरी मिळतो. विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयात पूर्ण पगार दिला जात नाही. त्याचबरोबर काही वर्ष प्राध्यापकांना विनावेतन राबवून घेतले जाते. यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे वाढत्या बेकारीचा फायदा संस्थाचालक घेतात. नोकरी देण्याकरिता प्राध्यापकांकडून कमीत कमी १ लाख रुपयांपर्यंत देणगी घेतात. नोकरी पक्की होईल व आपणाला पूर्ण पगार मिळेल या आशेवर प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी काम करतात.

प्रश्न क्र. ४ हा प्राध्यापकांच्या पगाराबाबत कोणत्या अडचणी येतात असा विचारला होता.

एकूण ९(९० टक्के) संस्थाचालकांनी कोणत्याही अडचणी येत नाहीत असे सांगितले. अर्थातच ही कनिष्ठ महाविद्यालये अनुदानित होती तर एका (१० टक्के) संस्थाचालकांने कनिष्ठ महाविद्यालय विनाअनुदानित असल्याने पगार देणे शक्य होत नसल्याचे सांगितले.

यावरुन विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील कर्मचारी विनावेतन किंवा अल्प पगारावर काम करतो असे अढळले. त्याला वेळेवर पगार मिळत नसल्याचे दिसून आले. त्याचा प्रतिकूल परिणाम मानसिक अस्वास्थ्य व अध्यापनावर होतो असे संशोधकाला वाटते.

प्रश्न क्र.५ हा प्राध्यापकांच्या नेमणूका कोणत्या निकषावर करता असा विचारला होता.

सहा(७५ टक्के) संस्थाचालकांनी उमेदवाराचा विषय, अनुभव, पाठनिरीक्षण यावरुन नेमणूका केल्या जातात असे सांगितले जाते. तीन(३७.५ टक्के) संस्था चालकांनी फक्त गुणवत्तेचा विचार केला जातो असे सांगितले. एका(१२.५ टक्के) संस्थाचालकांनी उमेदवार किती क्रियाशिल आहे हे पाहून नेमणूक करतो असे सांगितले.

यावरुन बहुतांशी म्हणजेच निम्म्याहून अधिक संस्था चालक गुणवत्ता व उपयुक्ततेचाच विचार प्राध्यापक निवडीसाठी करतो. असे म्हणत असले तरी वस्तूस्थिती भिन्न होती. काही संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक यांच्याशी खाजगी चर्चा केली असता व प्रत्यक्ष भेटी व निरीक्षण यामधून नेमणूकीचे आदर्श निकष धाब्यावर बसविले जात होते. असे संशोधकाला आढळून आले. केवळ वशिला आणि देणगी याच दोन गोष्टी नियुक्तीसाठी महत्वाच्या असल्याचे आढळले. शक्यतो नातेवाईकांनाच नोकऱ्या दिल्या जातात विविध जाती,धर्म,पंथ यांचा विचारही त्या त्या जाती,धर्म,पंथ यांचे प्राबल्य असलेल्या संस्थेत केला जातो.

यावरुन गुणवत्ता हा निकष न राहता देणगी, वशिला याच गोष्टी महत्वाच्या आहेत असे संशोधकाला दिसून आले.

प्रश्न क्र.६ हा प्राध्यापक नियुक्तीत कोणत्या समस्या येतात असा विचारला होता. तीन(३७.५ टक्के) संस्थाचालकांनी रोस्टरमुळे उत्तम दर्जाचे प्राध्यापक घेता येत नाहीत असे सांगितले. तीन(३७.५ टक्के) संस्थाचालकांनी कोणतेही उत्तर दिले नाही. दोन(२५ टक्के) संस्थाचालकांनी रोस्टर बिंदूनुसार त्या त्या वेळी जाती, गुणवत्ता, इंग्रजी माध्यमिकचे प्रशिक्षित प्राध्यापक मिळत नसल्याचे सांगितले. यावरुन राखीव जागा व इतर समस्या जाणवल्यामुळे गुणवत्ता राखली जात नाही.

ग) <u>शासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखतीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन</u> :-

संशोधकाने मुलाखतीसाठी १० शासकीय अधिकाऱ्यांची निवड केली त्यांच्या नावांची सूची परिशिष्ठ क्र. ९ मध्ये देण्यात आली आहे. शासकीय आधिकाऱ्यांना

शैक्षणिक अर्हतेविषयी प्रश्न विचारला होता त्याबाबतची माहिती खालील कोष्टकात देण्यात आली आहे.

कोष्टक क्र. ५.४१

शासकीय अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक अर्हतेचे वर्गीकरण :-

| अ.क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एम.ए.एम.एड. | १ | १०.०० |
| २ | एम.ए.बी.एड. | ३ | ३०.०० |
| ३ | एम.एस्सी.बी.एड. | १ | १०.०० |
| ४ | बी.एस्सी.बी.एड. | १ | १०.०० |
| ५ | बी.ए.बी.एड. | ४ | ४०.०० |
| | एकूण | १० | |

वरील कोष्ठकावरुन असे स्पष्ट होते की, कनिष्ठ महाविद्यालयाचे शासकीय पातळीवर नियोजन व प्रशासन करणारे सर्व अधिकारी प्रशिक्षित होते. एम.ए. एम. एड. पदवीधारक अधिकाऱ्यांचे प्रमाण १(१० टक्के) होते. एम.ए. बी.एड. पदवीधारकांचे प्रमाण ३(३० टक्के) होते. पदव्युत्तर पदवीधारकांचे एकूण प्रमाण ५(५० टक्के) होते. शैक्षणिकदृष्टया तरी हे अधिकारी तुल्यबळ वाटत नाहीत.

शासकीय अधिकाऱ्यांना मुलाखतीमध्ये त्यांचा प्रशासनाचा अनुभव विचारला होता. त्यांच्याकडून मिळालेली माहिती खालील कोष्टकात दिलेली आहे.

कोष्टक क्र.५.४२

शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय अनुभवाविषयीचे वर्गीकरण

| अ.क्र. | अनुभव वर्षे (वारंवारिता) | प्रतिसादक संख्या | प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १ ते ५ | ५ | ५०.०० |
| २ | ६ ते १० | २ | २०.०० |
| ३ | ११ ते १५ | २ | २०.०० |
| ४ | १६ ते २० | १ | १०.०० |
| | एकूण | १० | |

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, १ ते ५ वर्षे प्रशासनाचा अनुभव असणारे ५(५० टक्के) शासकीय अधिकारी होते. १६ ते २० वर्षे अनुभव असणारे १( १० टक्के) अधिकारी होते. याचा अर्थ प्रशासनाचा अधिक अनुभव असलेले. दोन( २० टक्के) अधिकारी होते तर प्रशासनाचा कमी अनुभव असणारे ५(५० टक्के) अधिकारी होते. बहुतेक प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका या पदावर नुकत्याच झाल्याने त्यांचा प्रशासनाचा अनुभव कमी आढळला.

कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रवेशाचे नियोजन केले जाते काय हे जाणून घेण्यासाठी मुलाखतीच्यावेळी त्यांना प्रश्न विचारला होता. सात(७० टक्के) शासकीय अधिकाऱ्यांच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांच्या यादया तयार करुन त्यानुसार प्रवेश दिला जातो. इयत्ता ११वीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे काम विभागीय शिक्षण उपसंचालकाकडून केले जाते असे मुलाखतीच्या वेळी त्यांनी सांगितले.

सेवाजेष्ठतेनुसार प्राध्यापकांच्या वेतन मान्यता दिल्या जातात काय या संदर्भात मुलाखतीच्या वेळी प्रश्न विचारला होता.

आठ(८० टक्के) शासकीय अधिकाऱ्यांच्या मते प्राध्यापकांना वेतन मान्यता सेवाजेष्ठतेनुसार दिल्या जातात असे सांगितले.

कनिष्ठ महाविद्यालयांची वार्षिक तपासणी(पथक पर्यवेक्षण) दर वर्षी होते का हे जाणून घेण्यासाठी शासकीय आधिकाऱ्यांना प्रश्न विचारला असता ६(६० टक्के) शासकीय आधिकाऱ्यांनी दर वर्षी कनिष्ठ महाविद्यालयांची वार्षिक तपासणी केली जात नाही. असे सांगितले. तपासणी पथकाचे प्रमुख विभागीय शिक्षण उपसंचालक आणि सहाय्यक शिक्षण संचालक असतात.

या तपासणी पथकामध्ये शिक्षण उपसंचालक, सहाय्यक शिक्षण संचाालक, शिक्षाणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गट-शिक्षणाधिकारी व प्रत्येक विषयाचे विषयतज्ञ शिक्षक असतात. पाच(५० टक्के) आधिकाऱ्यांच्या मते दर ५ ते ७ वर्षाने कनिष्ठ महाविद्यालयाची वार्षिक तपासणी केली जाते.

वार्षिक तपासणीच्या वेळी दिलेल्या सुचना पुढील तपासणीच्या वेळी पाहिल्या जातात का असे विचारले असता आठ(८० टक्के) शासकिय अधिकाऱ्यांनी तपासणी अहवालातील त्रुटींची पूर्तता तपासणीच्या वेळी झाली किंवा नाही यांची पाहणी केली जाते असे सांगितले. त्याचबरोबर पूर्तता झाली नसल्यास पूर्तता करण्याबाबत सूचना केल्या जातात.

## ५.४ भेटी व निरीक्षणाद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण :-

बार्शी तालुक्यात एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालये आहेत. सर्वच कनिष्ठ महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्या भेटीद्वारे मिळालेली माहिती प्राचार्यांच्या प्रश्नावलीशी संबंधित होती ती दिलेली आहेच. उर्वरित माहिती खालील प्रमाणे आहे.

### क) प्राध्यापकासंबंधीची माहिती :-

१. प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालय हे माध्यमिकशी किंवा वरिष्ठ महाविद्यालयांशी संलग्नअ सलेले आढळले. स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय बार्शी तालुका एकही नाही. त्यामुळे तेथील प्राध्यापकांच्या अध्यापनामध्ये फरक दिसून आला. तो असा माध्यमिकशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात जवळजवळ सर्वच ठिकाणी कथन, वर्णन,

विस्तार पध्दतीचा अवलंब केला जातो. वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात व्याख्यान पध्दतीचा अवलंब केल्याचे दिसून आले.

२. माध्यमिकशी संलग्न बऱ्याच प्राध्यापकांना माध्यमिकच्या तासिका दिल्या जातात त्यामुळे त्यांच्यामध्ये निराशा असल्याचे आढळून आले.

३. वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न प्राध्यापक हे अध्यापनाबाबत समाधानी असल्याचे आढळून आले.

४. ऑफ तास किंवा बुलेटिन तासाला बहुतेक प्राध्यापक नुसते बसून राहतात व विद्यार्थ्यांना शांत बसण्याची सूचना देतात. थेडक्यात केवळ तासिका संपेपर्यंत वर्गात अशीच प्राध्यापकांची समजूत दिसून आली, वस्तुतः वेळ, श्रम व पैसा या गोष्टींचा हा अपव्यय आहे.

५. माध्यमिकशी संलग्न प्राध्यापकांनी वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालय असावे वाटते असे आढळून आले.

ख) भौतिक सुवधािविषयी माहिती :-

बार्शी तालुक्यातील एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयांना दिलेल्या भेटीतून संशोधकाच्या खालील बाबी निदर्शनास आल्या :-

१. बहुसंख्य ७३.३३ टक्के महाविद्यालयांच्या इमारती स्लॅबच्या असून काही इमारतीवर पत्रे होते.

२. दोन(१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये मंदीराच्या आवारात भरत होती.

३. तेरा(८६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये गावांपासून वाजवी अंतरावर असून बाकींची २(१३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये गावांत गजबजलेल्या परिसरात होती.

४. बहुसंख्य (७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग खोल्या पुरेशा होत्या.

५. आठ(५३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली होती.

६. दहा (६६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये हवेशीर वातारणात होती.

७. विज्ञान शाखा असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात सुसज्ज प्रयोगशाळा होती.

८. चार( २६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात समृध्द ग्रंथालय होते.

९. दहा ( ६६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयात सायकल स्टॅंड होते.

ग) <u>वर्ग खोल्या व इतर सुविधाविषयी माहिती</u> :-

१. बहुतांश कनिष्ठ महाविद्यालयातून वेळापत्रके दिसून आली.

२. अकरा(७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातून वर्ग खोल्यांची स्वच्छता होती.

३. दहा( ६६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग खोल्या हवेशीर वायुविजन युक्त होत्या.

४. आठ(५३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांना सभागृहाची सुविधा नव्हती.

५. दहा( ६६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातील भिंती बोलक्या होत्या, तेथे, चित्रे, तक्ते, नकाशे होते.

६. तेरा(८६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातून पुरेसे फर्निचर असल्याचे आढळून आले.

७. अकरा(७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयांना खेळाचे मैदान असल्याचे आढळून आले.

८. आठ(५३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालये बाग बगीचे असलेले दिसून आली.

९. अकरा(७३.३३ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातून अभ्यासक्रम नियोजन व घटक नियोजन केले आहे.

१०. तेरा(८६.६६ टक्के) कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये शिस्त असलेला दिसून आली.

<u>समारोप</u> :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्राचार्यांची प्रश्नावली, प्राध्यापक, संस्थाचालक व शासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती तसेच भेटी व निरीक्षण याद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे. यावरुन पुढील प्रकरणात निष्कर्ष व शिफारशी दिलेल्या आहेत.